कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क




● पुणे ● वर्ष १७ वे ● अंक २ रा ● एप्रिल-जून २०२१ ● किंमत रु. २०/- ● पृष्ठसंख्या ४० ● वार्षिक वर्गणी रु. १००/-

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!











www.2factor.in

Promote Your Business

Acquire New Customers

Deepen Customer Relationship

# BULK SMS
## *marketing*

**12%** of facebook posts are read

**29%** of tweets are read

**31%** of emails are opened

**98%** of text messages are read

CHECKED 150 TIMES A DAY

The average person looks at their phone 150 times a day

## MOBILES ADS

**75%** of people prefer receiving marketing messages via SMS

**15%** prefer receiving email ads

**10%** prefer in-app or push ads

Solv Technologies

2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park
Lower Parel, Mumbai 400013

www.2factor.in
sales@2factor.in
022-48933933

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क



संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!


| वर्ष १७ वे | एप्रिल-जून २०२१ | अंक २ रा |
|---|---|---|



**अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर** मोबा. ९८१९८८५६६५

**सचिव : श्री. गणेश गुर्जर** मोबा. ९८९०९९०११३

**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र करंबेळकर** मोबा. ९८२०२४२५३०


संस्था नोंदणी क्र. : महा-१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र. : एफ ४६५२३ पी. दि. ३/३/२०१६

## संपादक मंडळ


संपादक : श्री. हेमंत पुराणिक, ९९२३८१०१९४

तंत्रज्ञ : श्री. सचिन ताटके, ९८६७१९२३१०

सल्लागार : श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली-सदस्य, ९८३३१६३६५९

सदस्य : सौ. मेघा नाटेकर, ९६३७१५५९४८

श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, ९४०३७०२७३४

श्री. अविनाश मणेरीकर, ९४२२३७९८७८

प्रकाशक : श्री. गणेश गुर्जर, ८१४९९०७७८९


## जाहिरातीचे दर

| पान | एक वेळ | चार वेळा |
|---|---|---|
| पाव | रु. ५००/- | रु. २,०००/- |
| अर्धा | रु. १,०००/- | रु. ४,०००/- |
| पूर्ण | रु. २,०००/- | रु. ८,०००/- |
| शुभेच्छा | रु. ५००/- | रु. २,०००/- |
| पूर्ण पान रंगीत | रु. ३,०००/- | रु. १२,०००/- |
| पृष्ठदान | रु. २००/- | — |


- **नियतकालिकाचे नांव :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे **'संपर्क'**
- **पत्ता :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ, द्वारा : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंटस्, भटांचा बोळ, पुणे ४११ ०३०
- **संपादक :** श्री. हेमंत पुराणिक
- **मुद्रक :** प्रिन्ट व्ह्यू, बुधवार पेठ, फलटण ४१५ ५२३, जि. सातारा

**ऑफिस संपर्क :** ०२०-२४४३२४४३, मोबा. ८१४९९०७७८९
Email : bkmsindia@gmail.com


## शहर प्रतिनिधी


- श्री. प्रसाद पंडित, मुंबई, ९८६९१५५२१५
- श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
- श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली, ९८३३१६३६५९
- श्री. मनीष नवाथे, नागपूर, ९८५०३३१४६०
- सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९७३६७९
- श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा, ९०११०६३०३०
- श्री. दिलीप ढवळे, रत्नागिरी, ९४२२५४९०८५
- श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
- श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
- श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
- श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, पुणे ९४०३७०२७३४
- श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
- श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७९९६९७
- श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८८०१३८
- श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२०५६९०
- सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की, आपली वार्षिक वर्गणी आता रु. ३००/-, रु. ५००/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षांसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वतः रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी. (पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे ३० च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे.) शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक 055210110004008 असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयातच पाठवावा. कृपया मनिऑर्डर पाठवू नये.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री. गणेश गुर्जर यांनी मुद्रक प्रिन्ट व्ह्यू, २९९, कसबा पेठ, फलटण येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे
# संपर्क
संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!

## सुंदर

रोज नामस्मरण
केल्यावाचून राहू नकोस,
गुरु पाहताहेत तुला,
नामस्मरण मात्र विसरु नकोस...
तुझ्या वाटेत आडवे खूप येतील
पायात पाय घालून पाडतील
त्यांना घाबरून तुझं
उभं राहणं सोडू नकोस
गुरु पाहताहेत तुला,
नामस्मरण मात्र विसरु नकोस...
तुझं कौतुक प्रत्येकाला इथं
रुचेलच असं नाही
कौतुकासाठी तुझं नांव
सुचेलच असं नाही
तू मात्र इतरांचं कौतुक
करण्यास कचरु नकोस
गुरु पाहताहेत तुला,
नामस्मरण मात्र विसरु नकोस...
तुलासुद्धा मन आहे
हे माहीत आहे मला
पण परमेश्वर हृदयात असताना
काय रे कमी तुला
इतरांना भरभरून देणं मात्र
कधी सोडू नकोस
गुरू पाहताहेत तुला,
नामस्मरण मात्र विसरु नकोस...
रडावसं वाटतं तेव्हा
रडून तू मोकळा हो
कार्यासाठी लढावसं वाटतं तेव्हा
लढून तू मोकळा हो
रडण्यामध्ये मात्र तुझे
कार्य विसरू नकोस
गुरु पाहताहेत तुला,
नामस्मरण मात्र विसरु नकोस...
तुझ्या कार्याचे कोणाला पुरावे
द्यायची गरज नाही
कुणासाठी तुला कार्य
सोडायची गरज नाही
गुरु संकल्पासाठी पुढे
चालणं तू सोडू नकोस
गुरु पाहताहेत तुला,
नामस्मरण मात्र विसरु नकोस...

## अंतरंग


| लेख | लेखक | पान नं. |
|---|---|---|
| गुरुपौर्णिमा | श्री. बाळासाहेब भाटे | ४ |
| आशुतोषचा सिने जगतातील प्रवास | श्री. अशोक गोवारीकर | ६ |
| मी आहे ना... | श्री. प्रशांत जोशी | ९ |
| श्री शिल्लक | डॉ. श्रीकृष्ण जोशी | १० |
| आडनावांची जेवण-सभा | श्री. अविनाश हळबे | १२ |
| आजच्या पिढीला हे कळायलाच हवंय ! | सौ. लीना मुळ्ये | १३ |
| रेडिओच्या सुरम्य आठवणी | श्री. अवधूत हर्डीकर | १४ |
| राजापूरचे हे महत्त्व आपल्याला माहित आहे का ? | श्री. श्रीकांत हर्डीकर | १८ |
| निवृत्ती नंतर | | १९ |
| जेवणाचे ताट/ पान कसे वाढावे ? | डॉ. हेमंत सहस्त्रबुद्धे | २० |
| अक्षय्यतृतीयेचे महत्त्व | सौ. शुभदा गुर्जर | २४ |
| ५० व्या वाढदिवशी घेतल्या पाच मुली दत्तक | श्री. श्रीकांत हर्डीकर | २४ |
| आयुष्याला वळण देणारी मोलाची स्वाक्षरी | डॉ. दीपक शिकारपूर | २५ |
| विवेकी अधिकारी | श्री. संदीप कळके | २६ |
| मे. शंकर गणेश देवस्थळी | श्री. अमित शहाणे | २७ |
| शतायुषी : श्री. गंगाधरशास्त्री नवरे | श्री. हेमंत किर्लोस्कर | ३० |
| वार्षिक अहवाल | | ३१ |
| श्रद्धांजली | | ३६ |

# संपादकीय

सप्रेम नमस्कार,

आपणांस विदीत आहेच महाराष्ट्र राज्य सरकारने पुन्हा लॉकडाऊन सुरु केल्यामुळे सर्व व्यवस्थापनांवर बंधने आली. आपला महासंघ त्याचे विविध संलग्न संघाचे सर्व काम ठप्प झाले. कुठेही कार्यक्रम नाहीत, पोस्ट बंद त्यामुळे टपाल येत नाही. तसेच प्रिंटिंग प्रेस सुद्धा बंद. आपला 'संपर्क' आपण फलटण येथून छापून घेतो. कारण पुण्यातील प्रिंटिंगचे दर व फलटण अथवा निमशहरातील प्रिंटिंगचे दर यात बरीच तफावत दिसत होती. दोन्ही शहरांमधील प्रिंटींगची क्वॉलिटी सारखीच आहे परंतु महासंघाच्या आर्थिक परिस्थितीस जाणून विचार करून आपण प्रिंटिंग हे फलटणहून करून घेत आहोत. असो.. आपल्याला माहितच आहे, सन २०२० च्या दशहऱ्याच्या मुहूर्तावर आपण ऑक्टो-डिसेंबर २०२० च्या अंकाचे ई-प्रकाशन केले. कारण सर्व ठिकाणी लॉकडाऊन हा थोड्या प्रमाणात शिथिल झाला त्यामुळे हे शक्य. ऑक्टो-डिसेंबर आणि जाने-मार्च असे दोन्ही अंक आम्ही आपणांस पाठविले आहेत. सध्याच्या परिस्थितीला लक्षात घेऊन आपण आम्हांस सहकार्य केलेत. अंक पाठविण्यास जरी उशीर झाला तरीसुद्धा आपल्याकडून त्याचे स्वागत झाले.

जानेवारी-मार्च २०२१ मध्ये काही संघांनी महासंघाकडून आलेल्या/पाठविलेल्या पत्रांची दखल घेऊन ती पत्रे सभासदांना पाठविली. कुणी व्हॉटस्ॲपवर तर कुणी फोनवरून संपर्क करून सभासदांना प्रत्येकाची वर्गणीबाबत सद्यस्थिती काय आहे हे समजून सांगितले. त्यामुळे काही सभासदांनी त्यांची वर्गणी सरळ बँकेत, काहींनी शहर प्रतिनिधींना दिली आणि नंतर ती महासंघाकडे जमा होत आहे/ झाली आहे.

सद्य परिस्थितीमध्ये आपली सुरक्षितता सांभाळून जेवढे काम होईल तेवढे करावे. वर्गणी पुढे जमा झाली तरी काही हरकत नाही. आपली सुरक्षितता ही आपली जबाबदारी आहे. आपणां सर्वांना विनंती की, सरकारने घालून दिलेल्या नियमांचे म्हणजे मास्क वापरणे, सहा फुटाचे अंतर ठेवणे आणि आपले हात स्वच्छ धुणे, अत्यंत आवश्यक असेल तरच बाहेर पडणे याचे पालन केले तर 'कोविड' हा साथीचा रोग नक्कीच आटोक्यात येईल.

गेल्या तीन महिन्यात बऱ्याच सभासदांचे, विविध संघातील कार्यकारिणीमधील सदस्यांचे दुःखद निधन झाले. त्या सर्व ज्ञात-अज्ञात सभासदांना 'भावपूर्ण श्रद्धांजली' महासंघ आणि त्याचे संलग्न संघ व सभासद अशा सभासदांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

ॐ शांतीः शांतीः शांतीः !

दि. २५ मे २०२१

**- संपादक मंडळ**

# गुरुपौर्णिमा

**श्री. बाळासाहेब भाटे**, सातारा ※ मो. ९४२२४०२६४९



माझ्या व्यक्तिगत जीवनात पुस्तकांचा व्यासंग जोपासत असताना माझी पुस्तकांशी मैत्री झाली. ग्रंथवाचन ही मनाची भूक बनली. या वाटेवरून वाटचाल करीत असतांना साहित्यातील सुंदर, सुवासिक, मन टवटवीत करणारी मोहक शब्द फुले मला गवसली. माझी ओंजळ भरून वाहू लागली. मनाच्या गाभाऱ्यात ती शब्दफुले जतन केली. सृष्टीतील फुले कोमजतात पण साहित्यातील शब्दफुलांना चिरंतन चैतन्याचे वरदान लाभलेले असते. सकस, दर्जेदार साहित्याचे तसेच धार्मिक ग्रंथांचे वाचन करताना उद्‌बोधक माहितीच्या संकलनाचा छंद लागला. अशा मौलिक संकलनातून 'गुरुपौर्णिमा' या विषयावर गुंफलेली गंधीत शब्दफुलांची माळ आपणासाठी. संपर्क या त्रैमासिकाचा जानेवारी ते मार्च २०२१ या कालावधीमधील पहिला अंक एप्रिल महिन्यात हाती आला. मनाची प्रसन्नता वाढविणारे मुखपृष्ठ बघून आनंद वाटला. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची साखळी तोडण्यासाठी लावलेल्या कडक निर्बंधामुळे या कालावधीतील ज्या सणांचा आनंद आपल्याला मनसोक्त घेता आला नाही त्या सर्व सणांचा, उत्सवांचा, मुखपृष्ठावर कल्पकतेने केलेला वापर मनाला भावला. अर्थातच याचे सर्व श्रेय जाते ते फलटणचे श्री. बकुळ पराडकर आणि त्यांचे सर्व सहकारी यांना. सर्वांचे सर्वप्रथम मनःपूर्वक अभिनंदन. या वर्षातील 'संपर्क' चा दुसरा अंक हाती येण्यास जुलै महिना उजाडेल. कोरोनाची दुसरी लाट तोपर्यंत ओसरली असेल. देशवासियांचे जीवन पूर्ववत होईल असा सकारात्मक दृष्टीकोन मनी जागवू या. भावीकाळात येणाऱ्या सणांचा, उत्सवांचा आनंद पूर्वीप्रमाणे आपल्याला घेता येईल. दि. २३ जुलै २०२१ हा व्यासपूजेचा दिवस. अज्ञानाचा अंधःकार दूर करण्यासाठी ज्ञानाची ज्योत प्रज्वलीत करणाऱ्या गुरुला वंदन करण्याचा आनंदमय सोहळा - गुरुपौर्णिमा.

गुरुशिष्य परंपरा हा आपल्या भारतीय संस्कृतीचा लोभसवाणा पैलू. ज्ञान देणाऱ्या गुरुच्या प्रती कृतज्ञतेचा भाव, निस्सीम भक्ती, व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. महर्षी व्यास हे समाजाचे खरे गुरु होते. त्यामुळे परंपरागत व्यासपूजा ही गुरुपूजा मानली गेली आणि व्यासपौर्णिमा ही गुरुपौर्णिमा म्हणून साजरी होवू लागली. आषाढ शुद्ध पौर्णिमा म्हणजे व्यासपूजेचा दिवस. व्यासपूजेच्या या पवित्र दिवशी संस्कृती घडविणाऱ्यांचे पूजन केले जाते. संस्कृती घडविण्याचे मौलिक कार्य अनेक ऋषींनी वेगवेगळ्या रितीने केले. परंतु वेद व्यासांनी या सर्व विचारांचे संकलन करून आपल्या संस्कृतीचा ज्ञानकोष असा महाभारत ग्रंथ आपल्याला दिला. नर-नारायण पर्वतांच्या सानिध्यात असलेल्या बद्रीक्षेत्रात सतत तीन वर्षे लेखन करून त्यांनी हा ग्रंथ निर्माण केला. व्यासांच्या

वाणीतून उमललेले आणि गीतेचा उत्कट गंध ल्यालेले पावन कमळ म्हणजे महाभारत. व्यासांच्या महाभारताला केवळ भारतीय वाङ्मयात नव्हे तर विश्ववाङ्मयात तोड नाही. मानवी जीवनाचे समग्र दर्शन, भाषेची रसाळता, वर्णनाची भव्यता या गुणांमुळे या ग्रंथाला पाचव्या वेदाची उपमा प्राप्त झाली आहे. महाभारताद्धारे त्यांनी सांस्कृतिक विचार दृष्टान्तासहित समाजासमोर ठेवले म्हणून प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांनी देखिल महर्षी व्यासांची बिरुदावली गायली आहे.

महर्षी व्यासांना आपण हिंदू धर्माचे पिता मानतो. व्यक्तीचा मोक्ष आणि समाजाचा उद्धार या दोन्ही आदर्शाकडे अभेद्य दृष्टीने पहाणाऱ्या अध्यात्म परायण अशा व्यासांशिवाय दुसरा कुणीही थोर समाजशास्त्रज्ञ झाला नाही. त्यांचे वैदिक आणि लौकीक ज्ञान अचंबित करणारे होते. म्हणूनच व्यास वाणीला अनन्य साधारण महत्त्व आहे. महर्षी व्यास हे जीवनाचे खरे भाष्यकार होते. कारण त्यांनी समग्र रुपात जीवन जाणले होते. महर्षी व्यास म्हणतात की आपले जीवन म्हणजे केवळ प्रकाश नाही किंवा आपले जीवन म्हणजे केवळ अंधःकार नाही. मग जीवन म्हणजे आहे तरी काय? महर्षी व्यास म्हणतात, आपले जीवन म्हणजे सुखदुःखांचा समन्वय, भरती ओहोटीचा खेळ, छाया प्रकाशाचा लपंडाव.

महर्षी व्यासांचे जीवन आणि कवन अमर करण्यासाठी त्यांच्या अनुयायी चिंतकांनी संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या सर्वांनी त्यांच्यासाठी व्यास संबोधन निश्चित केले. सांस्कृतिक विचार ज्या पीठावरून सांगितले जातात त्या पीठाला आजही आपण व्यासपीठ असे म्हणतो. या व्यासपीठावर आरुढ होऊन जो निःस्वार्थ भावनेने स्वतःची उपासना किंवा भक्ती समजून स्वकर्तव्यरुपात संस्कृतीच्या प्रचाराचे जीवनव्रत घेतो त्याची पूजा या दिवशी करून कृतकृत्य व्हायचे असते, धन्य व्हायचे असते. महर्षी व्यास म्हणजे भारतीय संस्कृतीचे वैभव.

मंडळी ! गुरुच्या वाणीत मांगल्याचा संस्कार असतो. याच वाणीत शिष्याच्या जीवनाला आकार देण्याचे सामर्थ्य असते. गुरु शिष्याला स्वतःचे गुरुत्व देतो. शिष्याला स्वतःच्या प्रतिरुपात तयार करतो. गुरु शिष्याला आत्मबोध करून त्याला जीवनमुक्त करतो. तथापि, एवढ्यावरच गुरुचे कार्य थांबत नाही. शिष्याला झालेला आत्मबोध त्यांनी सर्व जगाला द्यावा अशी गुरुची इच्छा असते. निवृत्तीनाथांनी आपला वरदहस्त ज्ञानेश्वरांच्या मस्तकी ठेवून त्यांना सुखी केले हे खरे आहे. तथापि, हे सुख एकांतात, निवांत भोगण्यासाठी नव्हे. शंकरांनी तेजाचे सूत्र सूर्याच्या हाती दिले ते सूर्याने सर्व जगाला प्रकाश द्यावा म्हणूनच. चंद्राला शीतलता दिली ते त्याने सर्व विश्वाला शीतल ठेवावे यासाठीच. समुद्राने मेघांना पाणी दिले ते विश्वकल्याणासाठीच. दिव्याचा प्रकाश हा दिव्यापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण घराला शोभा आणतो. चंद्राच्या शक्तीने समुद्र उचंबळतो. वसंत ऋतुच्या सामर्थ्याने झाडेही दानसमर्थ होतात. गुरुच्या कृपेने शिष्याला असे जे वैभव मिळते ते विश्वकल्याणासाठीच. गुरुच्या कृपेने इवलाशा रोपाचा वेलू गगनावर जातो. आत्मज्ञानरुपी मोगरा फुलतो आणि त्याच्या सहवासात जन उद्धरतात.

**गुरु पूजिता कार्य सिद्धी मिळावी**
**जसे शिंपिता मूळ वेली फुलावी**
**- संत ज्ञानेश्वर माऊली**



# आशुतोषचा सिने जगतातील प्रवास



**श्री. अशोक गोवारीकर,** ज्येष्ठ छायाचित्रकार ✻ मो. ९८६९०३०६८४




आशुतोषच्या टेलिव्हिजन मालिकेतील काम आणि त्याने सिनेमामधे केलेले काम यांनी त्याला खूप प्रसिद्धी मिळवून दिली यात शंकाच नाही. लोकप्रियताही पुष्कळ मिळाली. सी.आय.डी.मधे काम करत असताना कधी तो रस्त्यावरुन जाते वेळी अथवा एअरपोर्टवर गेला असताना, ड्युटीवरील कॉन्स्टेबल्स् फटाफट सॅल्युट करत असत. काहीजणांना एक दोन क्षणानंतर लक्षात येत असे की, 'अरे हा तर टीव्हीवरील पोलीस अधिकारी !' आणि मग एकदम दिलखुलास हसत ते अशुशी हस्तांदोलन करीत. पण याच त्याच्या वेगवेगळ्या मालिकांमुळे त्याला नवीन कामे व अनुभव मिळत गेले. अमोल पालेकर दिग्दर्शित 'कच्ची धूप'मध्ये त्याने केलेली निखिल सरची भूमिका लोकांना फार आवडली. ती भूमिका पाहून आणि त्याचं 'होली' या केतन मेहता दिग्दर्शित सिनेमातील काम पाहून त्याला हॉलिवुडचे एक निर्माते डेव्हिड राठोड यांनी त्यांच्या फिल्मसाठी निवडले. डेव्हिड यांच्या मातोश्री अमेरिकन व वडील भारतीय होते. त्यांच्या सिनेमाचं नाव होतं West Is West. एक भारतीय तरुण अमेरिकेविषयी, तिथल्या सुखसोयी व पैसा याविषयी आकर्षित होऊन तिकडे जातो व त्याचा भ्रमनिरास होऊन तो परत भारतात येतो अशा प्रकारची कथा होती. हा चित्रपट भारतामध्ये प्रदर्शित केला नाही. अमेरिकेत दाखवला गेला. काही फेस्टिव्हलमध्ये पण दाखवला आणि त्याचं कौतुकपण झालं. हायडी कारपेंटर नावाची नायिका होती. पर्ल पदमसीपण घरमालकीणीच्या भूमिकेमधे होत्या. चार साडे चार महिने सनफ्रान्सिस्को व लॉस एंजेलिस येथे राहिल्यामुळे आशुला तिथल्या कार्यपद्धतीची ओळख झाली.

'लगान'मुळे आशुला जागतिक कीर्ति मिळाली. वेगवेगळ्या देशामधे 'लगान' दाखवला गेला व त्याला पारितोषिके मिळत गेली. 'लगान'ला सर्वाधिक लोकप्रिय चित्रपट म्हणून राष्ट्रीय पारितोषिक राष्ट्रपती महोदय डॉ. कलाम साहेब यांच्या हस्ते आशुला देण्यात आलं. पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी अजिबात वेळ नसल्यामुळे फक्त अर्ध्या तासासाठी 'लगान' पहायला आले आणि संपूर्ण सिनेमा पाहिला. त्यांना 'लगान' फार आवडला. 'लगान'ची निवड ऑस्करसाठी 'परदेशी भाषेतील पाच उत्कृष्ट चित्रपट' या विभागामध्ये झाली, पण त्यावेळी 'No Man's Land' या चित्रपटाला पहिलं पारितोषिक मिळालं. जवळ जवळ दिड महिना आशुतोष हॉलिवुडमध्ये राहिला होता. 'लगान' पाहण्यासाठी हॉलिवुडचे अनेक दिग्गज कलाकार, दिग्दर्शक व इतर तंत्रज्ञ आले होते. 'लगान'ला पहिलं पारितोषिक मिळालं नाही म्हणून त्यापैकी बऱ्याच जणांनी आशुला प्रत्यक्ष भेटून आश्चर्य व्यक्त केलं आणि सांगितलं की, 'आम्ही 'लगान'ला मत दिलं होतं. लगानच्या सुरवातीचा एक मजेशीर किस्सा आठवतो. जेव्हा 'लगान'साठी ब्रिटिश कलाकार निवडण्यासाठी आशु लंडनला तीन आठवडे राहिला होता त्यावेळेस एक कलाकार आशुला फार आवडला. उंचनिच, देखणा, छान व्यक्तिमत्त्व, पण चेहऱ्यावरचे भाव निर्मळ, दयाळु व सज्जन. कॅप्टन रसेलच्या खलनायकाच्या भूमिकेला अगदी अयोग्य. त्याचा इंटरव्ह्यू झाला. अभिनयाची परीक्षा

झाली आणि त्या सर्वात तो पास झाला तरीसुद्धा आशुनी त्याला नाकारला. त्याला फार वाईट वाटलं. आशु त्याला म्हणाला, 'बाबारे तू फारच चांगला आहेस. हिरोची पर्सनॅलिटी आहे. तुला मी खलनायक नाही करू शकत.' पुढे थोड्याच वर्षात हॉलिवुडमधे मोठा हिरो झाला. त्याचं नाव जेरार्ड बटलर. त्याचे '३00', 'ऑलिम्पस् हॅज फॉलन... हे सिनेमे फार गाजले. 'What's Your Raashee' या चित्रपटाच्या शुटिंगच्या वेळी तो जयपूरला एका शुटिंगसाठी आला होता, तेव्हा आशुला भेटला. तो म्हणाला, 'मी सगळ्यांना सांगतो की मला 'लगान'चा डायरेक्टर आशुतोषने रिजेक्ट केलं आणि मी हिरो झालो.' जयपूरमध्ये त्याच्या बरोबर त्याचे सहकलाकार आणि इतर बरीच मंडळी होती. त्यांनाही जोर जोरात हसत त्याने सांगितले. 'ह्या डायरेक्टरनी मला रिजेक्ट केलं होतं.' स्वित्झर्लंडमध्ये लोकार्नो नावाच्या गावी 'लोकार्नो फिल्म फेस्टीवलमधे' लगान दाखवला गेला. वेगवेगळ्या देशांचे उत्कृष्ट चित्रपट आले होते. अमेरिकेचे व इंग्लंडचे पण होते. या सर्व चित्रपटामध्ये 'लगान'ची निवड उत्कृष्ट चित्रपट म्हणून आठ हजार प्रेक्षकांनी एकमताने केली व 'गोल्डन लेपर्ड' हा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार लगानला मिळाला. आशुतोष जेव्हा



स्टेजवर आला तेव्हा आठ हजार प्रेक्षकांनी उभे राहून पाच मिनिटे टाळ्या वाजवल्या.

जेव्हा 'स्वदेस' बनवण्यास घेतला तेव्हा चित्रपटाचा नायक मोहन भार्गव हा अमेरिकेच्या 'नासा'मधे काम करतो असं दाखवलं. त्यावेळी आशुला समजलं की, कोणलाही 'नासा'मधे चित्रिकरणाची परवानगी दिली जात नाही. पण आपण प्रयत्न करायला काय हरकत आहे असं म्हणून आशुतोषने 'नासा'ला पत्र लिहिलं. त्यामधे आपण 'ऑस्कर नॉमिनेटेड' लगान या चित्रपटाचा दिग्दर्शक आहे असं कळवलं. त्याबरोबर त्याला ताबडतोब भेटायला येण्याविषयी उत्तर आलं. आशु अमेरिकेला गेला. नासाच्या संबंधीत अधिकाऱ्यांशी चर्चा झाली, त्यांनी 'स्वदेस'ची कहाणी ऐकली, 'लगान' डीव्हीडीवर पाहिला आणि नंतर लगेच परवानगी दिली. नंतर प्रत्यक्ष चित्रिकरण सुरु झाल्यावर ज्या जागा निर्बंधीत होत्या व जिथे चित्रिकरण किंवा फोटोग्राफीला परवानगी नव्हती अशा जागीदेखील चित्रिकरण करण्यास परवानगी दिली. इतकंच नव्हे तर नासाची जी कंट्रोल रुम आहे, जिथे आजपर्यंत कुणालाही चित्रिकरणाची परवानगी दिली नव्हती तिथे आपल्याला चित्रिकरणाची परवानगी दिली. नासा मधे शुटींग जवळजवळ तीन आठवडे चाललं. त्या कालावधीत तेथील शास्त्रज्ञ आशुतोषच्या खूप परिचयाचे झाले व मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित झाले. काही शास्त्रज्ञ तर इतके उत्साही होते की त्यांना शुटींगमधे भाग घ्यावासा वाटला. मग प्रत्यक्ष शॉट घेताना मागे फाइल घेऊन इकडून तिकडे जाणे वगैरे अभिनय त्यांच्यापैकी काहींनी केले. त्यामुळे 'स्वदेस'मधे जे रॉकेट लाँचिंग दाखवले आहे ती कंट्रोल रुम नासांची कंट्रोल रुम आहे. आणि त्या कंट्रोलरुम मधे जे शास्त्रज्ञ दिसतात त्यामधे बरेचसे खरेखुरे अमेरिकन

शास्त्रज्ञ आहेत. २१ जुलै १९६९ रोजी अपोलो-११ मधून नील आर्मस्ट्राँग व एडविन आल्ड्रिन हे चंद्रावर गेले त्या सर्व ट्रिपचं मार्गदर्शन व नियंत्रण याच कंट्रोलरुममधून करण्यात आलं. मोहन भार्गव (शाहरुख खान स्वदेस मधे) जेव्हा 'स्वदेस' मध्ये रॉकेट लाँच करतो त्यावेळी, २०-१९-१८-१७ असे उलटे आकडे मोजणारी (countdown) जी स्त्री आहे ती खरोखरीच वास्तवातील काउंटडाऊन करणारी शास्त्रज्ञ आहे. त्यांनी दिलेलं हे सहकार्य हे आशुच्या व्यक्तिमत्वाचा चमत्कार आहे असं मला वाटतं.

लगानच्या वेळी 'लगान' पाहून जे अनेक



परदेशी प्रभावित झाले होते त्यामधे उर्सुला अँड्रेस एक होती. तुम्हाला आठवत असेल, उर्सुला ही शॉन कॉनरीचा पहिला जेम्स बॉण्ड चित्रपट डॉ. नो मधे नायिका होती आणि जेव्हा तिला संधी मिळाली तेव्हा ती आशुला खास म्हणून भेटायला आली. रॉबर्ट डीनेरो या हॉलिवुडच्या प्रख्यात नटाला 'लगान' फार आवडला. लगानचं दिग्दर्शन फार भावलं. त्याच्या नावाने एक जागतिक फिल्म फेस्टीव्हल मध्यपूर्व आशियामधे दरवर्षी होतो. त्यामधे आशुने जज्ज म्हणून काम करण्याची विनंती फेस्टिवल आयोजकांनी केली. दोन-तीन वर्ष आशुने ते काम केलं. इथल्या स्वतःच्या चित्रपटाच्या चित्रिकरणामुळे दरवर्षी हे जाणं जमत नाही. सर्वसाधारणपणे अशा फेस्टिवलला नट-नट्यांची मोठी छायाचित्रे लावली जातात, मोठ्या जागी प्रदर्शित करतात, पण या फेस्टिवलला एका जज्जचं म्हणजे आशुचं भलं मोठं पोस्टर लावण्यात आलं. आशुचा नुसता चेहरा व खांद्याचा थोडासा भाग दिसेल असा फोटो लावला. या चित्राचा आकार म्हणजे त्यासमोर एक गाडी आणि वर एक सिमेंट मिक्सरचा टँकर छोटे दिसताहेत. एक प्रकारे त्याच्या योग्यतेची पावतीच दिल्यासारखं हे आहे.

जेव्हा जोधा अकबर प्रदर्शित झाला तेव्हा न्युयॉर्क टाईम्सनी परीक्षणामधे लिहिलं, 'अशा भव्यतेचे सिनेमे पूर्वी हॉलिवूडमधे निघत असत आणि ते आता हॉलिवूडने बंद केले. पण अजून बॉलिवुडमधे ते काढतात. जोधा अकबरची भव्यता आणि निर्मितीमूल्य पाहिलं तर सेसिल बी. डोमिलची आठवण येईल.' सेसिल बी. डोमिल या जगद्विख्यात दिग्दर्शकाबरोबर तुलना होणं हेच फार मोठं कौतुक म्हणावं लागेल. दुसऱ्या एका अमेरिकन परीक्षकाने जोधा अकबरची तुलना डेव्हिड लिन व जपानी दिग्दर्शक अकिरा कुरोसावा यांच्या कलाकृतींशी केली. या जगद्विख्यात लोकांच्या पंक्तित आशुला बसवणं हाच एक मोठा सन्मान आहे. जोधा अकबर प्रदर्शित होण्याच्या अगोदरच राजस्थान मधे काही लोकांनी आंदोलन सुरु केले. काही गैरसमजामुळे त्यांना असं वाटलं की राजपूत लोकांचा अपमान चित्रपटामधे झाला आहे. त्यामुळे राजस्थानमधे तो



चित्रपट प्रदर्शित होऊ शकला नाही. त्यावेळी आसामचे राज्यपाल म्हणून निवृत्त लेफ्टनंट जनरल राजेंद्रसिंह हे नियुक्त होते. ते स्वतः राजपूत आहेत व त्यांची पत्नीही राजपूत आहे. त्यांनी हा सिनेमा पाहिला आणि स्वतःहून एक अभिनंदनाचं पत्र राज्यपालांच्या अधिकृत लेटरपॅडवर पाठवले व आयुष्यात पाहिलेला सर्वोत्कृष्ट चित्रपट असं कौतुक केलं.

अतिशयोक्तीचा आरोप न घेता मी असं म्हणेन की वेगवेगळ्या देशातील चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, दुसरे तंत्रज्ञ त्याचप्रमाणे वेगवेगळ्या क्षेत्रातील नावाजलेली मंडळी, उद्योगपती, राजकारणी, अनेक देशांचे अम्बॅसॅडर्स व इतर राजनैतिक अधिकारी हे आशुला नुसते ओळखतच नाहीत तर त्याच्याशी असलेली मैत्री भूषणास्पद मानतात. हॉलिवुडचे स्टीव्हन स्पीलबर्ग, टॉम क्रुझ, रॉबर्ट डिनेरो वगैरे मंडळी वैयक्तिकरीत्या ओळखीची आहेत.

देश विदेशातून अनेक पत्रे येतात. काहीजण त्याच्या चित्रपटांची स्तुती करतात, काहीजण काही




सूचना करतात, कुणाकडे काही नवीन कल्पना असतात. हे सर्व लोक आशुला पत्र लिहितात. त्यापैकी बऱ्याच लोकांना आशुचा पत्ता माहित असत नाही मग नुसतं आशुतोष गोवारीकर, डायरेक्टर आणि मुंबई एवढंच लिहितात आणि ती या सव्वा कोटीची लोकसंख्या असलेल्या या प्रचंड शहरातल्या आमच्या बांद्रा इथल्या निवासस्थानी मुंबई शहराचं हे पोस्ट खातं बरोबर पोहोचवते हे खरोखर कौतुकास्पद आहे.

(लोकमत, कोल्हापूर
जून-जुलै, २०१५ च्या वार्षिक अंकातून)

## मी आहे ना...

**श्री. प्रशांत जोशी**, पुणे

आपल्या आयुष्यात आलेली माणसं ही काही उगाच आलेली नसतात. प्रत्येक गोष्टीमागे काहीतरी कारण असतं. कुणाशी तरी काहीतरी ऋणानुबंध जुळलेले असतात. नाहीतर सव्वाशे करोड लोकसंख्येच्या देशात नेमक्या याच व्यक्तीशी आपली ओळख का होते ? याचे उत्तर कोणीही देऊ शकत नाही.

जी नाती तयार होतात ती आपण जीवापाड जपावी. आपल्या जगण्यासाठी ज्या प्राणवायुची गरज असते तो प्राणवायू म्हणजे ही आपलं माणसं... रक्ताच्या नात्यांना काही चॉईस नसतो, पण आपलेपणाच्या नात्यात तसं नसतं. Its mutual relation... मन जुळलं की आपलेपणाचं नातं होतं.

जे बंध खूप स्ट्रॉंग असतात ते कोणाच्याही सांगण्याने किंवा विपरीत परिस्थितीत कधीच तुटत नाहीत. आपण खूप वाईट परिस्थितीतून जात असताना मित्राचे किंवा मैत्रिणीचे ‘मी आहे ना’ एवढे शब्द संजीवनीसारखे काम करतात. अगदी प्रत्यक्ष नाही पण अप्रत्यक्ष सोबत असणं खूप सकारात्मक ऊर्जा देणारं असतं. पैशांनी श्रीमंत होणं खूप सोपं आहे हो... नात्यांनी समृद्ध होणं तितकंच कठीण.. Keep in touch....

# श्री शिल्लक

**डॉ. श्रीकृष्ण जोशी,** रत्नागिरी * मो. ९४२३८७५८०६

तिला कळत नव्हतं, त्यांच्या मनात नेमकं काय चाललंय. कालपासून त्यांचं वागणं काहीसं अनाकलनीय वाटत होतं. पंचेचाळीस वर्षाच्या सहजीवनाचा इतिहास ती कालपासून धुंडाळत होती. थोडंसं काही हाती लागत होतं, काही हातातून निसटून जात होतं. पण कालपासूनच्या वागण्याचा बोध तिला होत नव्हता. तोंडाला चव नाही, अंगात थोडी कणकण जाणवतेय आणि श्वास घ्यायला अडचण होतेय, हे त्यांनी सांगितल्यावर ती धास्तावली होती. आग्रह करकरून तिनं, त्यांना टेस्ट करायला पाठवलं होतं. पण रिपोर्टमध्ये काय आहे हे ते सांगत नव्हते. तिनं विचारलं होतं. वेगवेगळ्या वेळी, अचानक, प्रेमाने, भांडून, अबोला धरून, पण त्यांनी रिपोर्ट बद्दल एक शब्द उच्चारला नव्हता. बरं, लॅब मध्ये चौकशी करावी तर शहरात सतराशे साठ लॅब. ती हैराण झाली होती.

संध्याकाळी गॅलरीतून ते कुणाशी तरी फोनवर बोलताना तिनं ऐकलं होतं. तुटक संभाषण कानावर आलं होतं. ''बेड.. ऑक्सिजन.. व्हेंटिलेटर... दोन्ही वेळचं साधं जेवण..'' आणि असं बरंच काही. तिचा धीर पार सुटत चालला होता. डोळे प्रवाहित झाले होते. ''आज आपण मांडवीच्या जेटीवर जाऊ बसायला. गप्पा मारू भरपूर. आणि हो, तुला आवडणारी भेळ खाऊ. शहळ्याचं पाणी आणि मऊसूत खोबरं.''

तिला हुंदका अनावर झाला. ''आजच का?''

''सगळ्या गोष्टी अगोदर सांगायच्या नसतात, काही सरप्राईज ठेवायचं असतं. नियती नाही का सरप्राईज देत आपल्याला, तसं.''

''म्हणजे ?''

तिचा हात छातीवर गेला. श्वास मध्येच अडकल्यासारखा वाटला तिला.

''रिपोर्ट काय सांगतोय ?''

तिनं पुन्हा विचारलं. पण ते तिथे नव्हतेच. आणि हट्ट करून तिला मांडवीच्या जेटीवर आणलं होतं. ते दुरुन येताना दिसले. भेळ, शहाळ्याचं पाणी घेऊन येताना त्यांची तारांबळ उडत होती. पण तरीही उत्साह जाणवत होता. तिला कसंतरीच वाटलं. ती पुढं होणार इतक्या दहाबारा तरुण मुलंमुली त्यांना मदत करायला धावली.

''आजोबा, एक सेल्फी प्लीज.''

''शुअर, पण आमचा फोटो तुम्ही काढायचा. थांबा अगोदर पोज घेतो.'' त्यांनी भेळेचा घास तिच्या तोंडपर्यंत नेला. पोरं एव्हाना चेकाळली होती. एकीनं दोन स्ट्रॉ शहाळ्यात घातले.

''अहो, काय चाललंय हे, ओळखीची ना पाळखीची. काय म्हणतील ते.'' त्यांनी काही उत्तर दिलं नाही.

''अरे तिला लाजायला सांगणार नाही का तुम्ही ? लग्नात लय भारी लाजली होती.'' सगळे खिदळायला लागले. त्या पोरांना हे नवीन होतं.

''आणि तुम्हाला महाबळेश्वरची गंमत सांगू का, आमच्या साग्रसंगीत हनिमूनची ?''

एव्हाना मांडवीवर येणाऱ्यांची गर्दी वाढायला लागली होती. येणारी गर्दी तिथेच थांबून हे सगळं पाहू लागली होती. अनेकांच्या मोबाईलमधले कॅमेरे सुरु झाले होते. तिला मात्र मेल्याहून मेल्यासारखं झालं होतं.

''आजोबा हनिमूनचं काय झालं ?'' गर्दीतल्या कुणीतरी विचारलं.

''ते तिलाच विचारा.'' त्यांनी बॉल अलगद टोलवला.

''आजी सांगा ना.''

सगळ्यांनी टाळ्या वाजवत आग्रह धरला. आता आपण काही बोललो नाही तर प्रकरण वाढेल या भीतीनं तिनं हात उंचावला. सगळे गप्प झाले.

''महाबळेश्वरला जाताना, सातारा स्टँडवर ह्यांनी मोगऱ्याच्या गजऱ्यांची टोपलीच विकत घेतली होती. माझ्या मेलीच्या मनात काहीबाही येभ लागलं. कारण हे रसिक होते हे माहीत होतं. पण महाबळेश्वरला गेल्यावर वेगळंच घडलं. यांनी त्यादिवशी संध्याकाळी फिरायला आलेल्या सगळ्या नव्या जोडप्यांना एकत्र केलं आणि गजरे घालण्याचा सामुदायिक कार्यक्रम केला.''

''कसली धमाल आली माहित्येय. महाबळेश्वरची ती संध्याकाळ एकदम गुलाबी रंगाची होऊन गेली. सगळ्यांचे गाल लज्जेनं गुलाबी झाले होते ना.''

सगळी गर्दी तुफान हसली. आणि समुद्राच्या लाटा अधिकच फेसाळल्या.

आता तीदेखील गुंतू लागली.

''ह्यांनी मला प्रपोज केलं तो किस्सा जगावेगळा आहे. आमचं घर मंगलोरी कौलांचं होतं. हे शेजाऱ्यांच्या घरी पाहुणे म्हणून आले होते. दोनचार दिवसात आमची चांगलीच ओळख झाली होती. तर त्यादिवशी कौलं बदलण्याचं काम सुरु होतं. माझ्यावर इम्प्रेशन मारण्यासाठी हे छपरावर चढले आणि अचानक यांचा पाय घसरला. हे गडगडत खाली आले. पडले, पाय दुखावला, पण त्याही अवस्थेत, अनंताच्या झाडाचं फुल त्यांनी मिळवलं आणि वेदनेनं विव्हळत असताना सर्वांसमक्ष मला विचारलं, तुझ्या घरी प्रेमात 'पडलोय', स्वीकारशील ? मग काय मी लाजून आत पळाले. झालं. महिन्याभरात घरच्यांनी लग्नच लावून दिलं.''

तिनं ओंजळीत चेहरा लपवत सांगितलं. पण पुढच्या क्षणी तिला भान आलं आणि डोळ्यात आसवं उगवली.

''थँक्स मित्रांनो, मजा आली तुमच्या संगतीत. आता जरा कौटुंबिक जिव्हाळ्याचा प्रसंग सुरु होणार आहे.'' सगळे दूर पांगले.

''एक मिनीट, अशीच उभी राहा. मला फोटो काढू दे एक.''

तिला जास्त बोलू न देता त्यांनी पटकन फोटो काढला. मोबाईल तिच्या समोर धरला. अस्ताला जाणारा सूर्य नेमका तिच्या अंबाड्यात विसावल्यासारखा दिसत होता.

''हे काय आता नवीन ?''

''हा अस्ताला जाणारा सूर्य तुझ्या केसात गुंतला.''

ती बघत राहिली. अविश्वासाने.

''तुम्हाला काय म्हणायचंय ?''

ते हसले.

''तुझ्या मनात जे आहे ते माझ्या मनात नाही. हा सूर्य आज जरी अस्ताला जाणार असला तरी उद्या तो पुन्हा उगवणार आहे. आज अंबाड्यात विसावलेला सूर्य, उद्या तुझ्या जागं होण्याबरोबर खळाळत्या केसांमधून उगवणार आहे. मी त्याबाबत आश्वस्त आहे.''

''मग रिपोर्टचं काय ?''

तिनं पुन्हा चिकाटीनं विचारलं.

ते दिलखुलास हसले.

''तुला काय वाटलं, मला कोरोना झालाय ? मी पॉझिटिव्ह आहे ? वेडी गं वेडी. माझा निगेटिव्ह आलाय. बेड, ऑक्सिजन वगैरे सगळं नाटक करत

होतो मी. कालच कळलं मला मी निगेटिव्ह असल्याचं. पण मी विचार केला, पुन्हा एकदा एकदा संधी घेऊया आनंदानं जगण्याची. मजा घेऊ या तुझ्या वाढलेल्या टेन्शनची. पुन्हा एकदा बघू या आठवणींची श्री शिल्लक किती आहे ती. उद्याच्या दिलखुलास जगण्यासाठी आठवणींची श्री शिल्लक असणं गरजेचं आहे. नाही का ?''

''हो पण, त्या काळजीनं माझं काही बरं वाईट झालं असतं तर...''

''ते शक्यच नाही, कारण तुझ्या टेन्शनचं नियंत्रण माझ्या हाती आहे. हसायचं, हसवायचं आणि हसत हसत दिवस ढकलण्याची युक्ती मला माहित्येय.''

ती गप्प झाली. अचानक फोन हाती घेतला. ''आत्ता ? कुठे ? हॉस्पिटलमध्ये ? येतो लगेचच आम्ही. अहो, आपल्याला लगेचंच जायला हवं हॉस्पिटलमध्ये, चला लवकर, सांगते रिक्षात बसल्यावर.''

दोघेही रिक्षेत बसली. तिनं पत्ता सांगितला. ते चक्रावले.

''तू चुकून हॉस्पिटल ऐवजी हॉटेलचा पत्ता सांगितलास.''

''नाही हॉटेलचाच पत्ता सांगितला. श्री शिल्लक काय तुमच्याजवळ तेवढी आहे असं वाटलं का ? माझ्या जवळपण आहे. तुमच्या आवडत्या हॉटेलात कँडल लाईट डिनर घेणार आहोत आपण. तुमच्या आवडत्या मेन्यूसह.''

''मला आवडली तुझी श्री शिल्लक.''

ते म्हणाले आणि तिने त्यांच्या खांद्यावर डोकं टेकवलं. रिक्षा भरधाव धावू लागली.

**

## आडनावांची जेवण-सभा

**संग्राहक : श्री. अविनाश हळबे, पुणे,**
मो. ९०११०६८४७२

आडनावांनी जोरदार बेत केला जेवणाचा
सहस्त्रभोजनेंनी विडा उचलला निमंत्रणाचा

सोबत पाध्ये, उपाध्ये, पंडित व शास्त्री आले
देवधर येताच देवापुढे परांजप्यांनी दिवे लावले

नंतर श्रीमंत कानडे, फडतरे, साधले आले
सराफांनी पेठे, गाडगीळांना सोबत आणले

गंधे, नेने, लेले, साने पोहचले अगदी वेळेवर
उपाध्यांनी लाविले टिळक सर्वांच्या कपाळावर

दूध घेवोनी पुरोहित, पणशीकर पळत आले
सोबत श्रीखंडे, भातखंडे, केळापूरे आले

भाजीसाठी भोपटकर, फणसळकर व आठल्ये जमले
जोशी, भोळे, शेवडे यांनी त्यांना सोलून काढले

पोळी भाजी बरोबर करकरे लोणचे वाढले,
बर्वे वाटूनी चटणी चटपट, बापट भात वाढू लागले

रसभरीत पुरोहितांनी केले गोडांबे, वळांबे
लेले, दामले, छत्रे, अत्रे घेती ताक, पाण्याचे तांबे

पंगत बसण्याआधी, सावध फडके उत्साही जाहले
कचरे आणिक धुळेंना शांतपणे झाडून बाहेर काढले

जेवणावर गोड करण्या रमले सारे नवरे, गोडबोले
केळकर, बोरकर, आंबेकरांचे मिश्रण सर्वांनी चापले

होता नंतर कार्यक्रम संगीत, नृत्य, नकलांचा
अत्रे, पंडीत, बल्लाळ ते गायले, प्रवेश नंतर
ललिताचा

आचार्यांचा सन्मान करती जोशी, कात्रे नारवरे
पुराणिकांनी दिली शाल, देव देती श्रीफळे

शौर्य भडकमकरांचे, कर्म करमरकरांचे
खर्च नीट सांभाळती, दामले सर्व व्यवहारांचे

आकाशी दाटले मेघ काळे, चिंतीत आपटे, बापट
शहाणे म्हणती संपवा आता, निघाले त्वरीत सारे भट

# आजच्या पिढीला हे कळायलाच हवंय !

**सौ. लीना मुळ्ये,** * मो. ९८२३०५००३८

आम्हाला मात्र क्षणोक्षणी जाणवतंय !...
लहानपणी सक्तीने एरंडेल पाजले जायचे
बुळबुळीत लागले तरी गिळावंच लागायचे
नंतर लोटा-परेड होणे अनिवार्य असायचे
आज उतारवयातही पचनशक्ती उत्तम आहे
त्या एरंडेलचे महत्त्व आताशा जाणवतंय.
लहानपणी पाढे तोंडपाठ करावे लागायचे
कविता, श्लोक घोकावेच लागायचे
सनावळ्यानाही विशेष महत्त्व असायचे
आज उतारवयातही स्मरणशक्ती उत्तम आहे
त्या पाठांतराचे महत्त्व आता जाणवतंय.
लहानपणी शाळेत पायी जावे लागायचे
कॉलेजसाठी सायकलशिवाय वाहन नसायचे
सगळे खेळ पण भरपूर धावपळीचे असायचे
आज उतारवयातही अंगकाठी सडसडीत आहे
त्या पायपीटीचे महत्त्व आता जाणवतंय.
लहानपणी जेवणात आवड निवड नसायची
वरण, भात, पालेभाजी, आमटी खावीच लागायची
ताजे ताक फोडणीच्या पोळीचीही सक्ती व्हायची
आज उतारवयातही भूक, बीपी शुगरचा त्रास नाही
त्या चौरस आहाराचे महत्त्व आता जाणवतंय.
लहानपणी तिन्ही सांजेला सायंप्रार्थना असायची
पंधरावा अध्याय म्हणायची सक्ती व्हायची
रामरक्षा, भीमरुपीपासून तर सुटकाच नसायची
आज उतारवयातही मन अत्यंत निर्भय आहे
त्या भीमरुपीचे महत्त्व आता जाणवतंय.
लहानपणी खोटे बोलायची शामत नसायची
फुकटचे काही घेतले तर शिक्षाच व्हायची
उधारी-उसनवारी लाजीरवाणी वाटायची
आज उतारवयातही स्वाभिमानाने जगतो आहे
त्या शिकवणीचे महत्त्व आता जाणवतंय.
लहानपणी अभ्यास स्वतः करावा लागायचा
ट्युशन, गाईड, कॉपीचा तर विटाळच असायचा
कमी मार्क मिळाल्यावर (बाबांना ग चा म येत नसले तरी) दणकेबाज मार खावा लागायचा
आज उतारवयातही बुद्धी भ्रष्ट झाली नाही
त्या स्वाध्यायाचे महत्त्व आता जाणवतंय.
लहानपणी मोठ्यांचा मान राखावा लागायचा
उलट उत्तर देण्याचा तर प्रश्नच नसायचा
मग रागावलेला माणूसही आशीर्वाद देऊनच जायचा
आज भरल्या घरात अत्यंत सन्मानाने रहातोय
त्या संस्कारांचे महत्त्व आता जाणवतंय.
लहानपणी शिस्तीसाठी आईचा धपाटा खाल्लाय
किशोरवयात त्यासाठीच वडिलांकडून खाल्लाय
शाळेत प्रत्येक चुकीला शिक्षकांकडूनही खाल्लाय
आज उतारवयातही शिस्तबद्ध जीवन जगतोय
त्या खाल्लेल्या माराचे महत्त्व आता जाणवतंय
लहानपणी एकत्र कुटुंब पद्धती असायची
घरोघरची आई 'श्यामची आई'च असायची
वडिलांची करडी नजर प्रेमापोटीच असायची
आज त्यांची उणीव ठायी-ठायी जाणवतेय
त्यांच्या वात्सल्याचे महत्त्व आता जाणवतंय.
लहानपणी वाढदिवस साधेपणाने साजरा व्हायचा
एखादेच चॉकलेट, पण मोठ्यांचा आशीर्वाद मिळायचा
आई-बाबा-आज्जीचा हात मस्तकावरुन फिरायचा
आज अमृतमहोत्सवाकडे आरामात वाटचाल करताहेत
'आयुष्यमान भव ! चे महत्त्व आता जाणवतंय.'

**

# रेडिओच्या सुरम्य आठवणी

**श्री. अवधूत हर्डीकर, पुणे**



हे सगळं आपण अनुभवलंय....
ते परत एकदा जागवा...

'आकाशवाणीचे हे पुणे केंद्र आहे...'

भाग - १

'नमस्कार श्रोतेहो... !'

मध्यम लहरी... तीनशे अठ्ठ्यात्तर अंश सात आठ मीटर्स अर्थात सातशे ब्याण्णव किलोहर्ट्झ... वर आकाशवाणीचे हे पुणे केंद्र आहे' किंवा '२३९.८१ मीटर म्हणजेच १२९१ किलोहर्ट्झ वर आकाशवाणीच्या सांगली केंद्रावरून आम्ही बोलत आहोत. सकाळचे पाच वाजून पन्नास मिनिटे व दहा सेकंद झाली आहेत.' असा निवेदिकेचा मंजूळ स्वर कानी पडायचा आणि सनईचे सूर वाजायचे. कधी सांगली, कधी पुणे, तर कधी मुंबई केंद्र एवढाच काय तो फरक. बाकी कार्यक्रम सगळीकडे तितकेच सुरेल आणि सुंदर....

हे सगळं काय ? तर एकेकाळचा 'रेडिओ' आणि 'आमचं जीवन' आज पुन्हा आठवलं... नव्यानं !

किती रम्य दिवस होते ते आणि अविस्मरणीय आठवणी ! आठवण एवढ्याच साठी म्हटलं कारण आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात त्याचं एक वेगळं स्थान होतं. कारण त्या 'रेडिओच्या जमान्यात' आपण लहानाचे मोठे झालो आणि हा रेडिओ म्हणजे आपल्या घराचा, कुटुंबाचा एक सदस्य होता.

माझं बालपण हे दोन वेगवेगळ्या घरामधून गेलेलं. मातीच्या भिंती आणि काळ्या कौलाचं छप्पर असलेलं घर. बाहेरच्या खोलीतील एका भिंतीवरच्या कपाटात असायचा आमचा भला मोठा रेडिओ. त्यानंतर दुसऱ्या घरात तो लाकडी फळीवर आला. त्याला जोडलेला एक स्पिकर बॉक्स स्वैपाकघरातपण असायचा. कालांतराने आमच्याकडे मर्फीचा ट्रान्झिस्टरपण आला. त्याला चामड्याचं एक भक्कम कव्हर पण होतं... आणि गळ्यात अडकावायला त्याला चामड्याचा एक पातळ पट्टा होता. त्याकाळी रेडिओला वर्षाला सहा रुपये लायसन्स असायचे... आमचा हा रेडिओ इलेक्ट्रिकवर चालणारा असायचा आणि ट्रान्झिस्टर इलेक्ट्रिक आणि सेल दोन्हीवर चालायचा... एकाचवेळी तीन सेल टाकावे लागायचे... तेव्हा एव्हरेडी आणि निप्पो कंपनीचे सेल मिळायचे असो..

असा हा आमचा रेडिओ सकाळी पाच वाजून पन्नास मिनिटांनी एका विशिष्ट धुन ने चालू व्हायचा... एक मिनिटाची ती धून बंद होताच... आपोआप 'वंदे मातरम्' सुरु व्हायचे अन् मग दिल्ली केंद्रावरून प्रक्षेपित होणाऱ्या व पुणे केंद्राहून सहक्षेपित हिंदी बातम्या प्रसारित व्हायच्या. 'ये (थोडा श्वास घ्यायचा, मग) आकाशवाणी है, अब देवकी नंदन पांडे से समाचार सुनिये' हा आवाज म्हणजे तेव्हा देशाचा आवाज झाला होता.

एकदा बातम्या संपल्या की मग प्रभात वंदन व लगेच भक्तीगीतांचा कार्यक्रम सुरु व्हायचा... दिवसाची खऱ्या अर्थानं मंगलमय सुरुवात असायची ती...

घनश्याम सुंदरा, श्रीधरा अरुणोदय झाला... उठी लौकरी वनमाळी उदयाचळीं मित्र आला.. आनंदकंदा प्रभात झाली. उठी सरली राती.. काढी धार क्षीरपात्र घेऊनी.. धेनू हंबरती.. लक्षीताती वांसुरेंहरी धेनुस्तनपानाला... या भूपाळीबरोबर लता मंगेशकर यांची 'रंगा येई वो रे... विठाई विठाई माझी कृष्णाई – कान्हाईऽऽ' किंवा 'पैल तोहे कावू कोकताहे, शकून गे माहे सांगताहे..', 'भेटी लागी जीवा लागलेसी आस, पाहे रात्रंदिवस वाट तुझी' असं भक्तिमय संगीत चालू असायचं. याला जोड म्हणून पंडित भीमसेन जोशी यांची 'इंद्रायणी काठी देवाची आळंदी.. लागली समाधी ज्ञानेशाची..' किंवा मोठी तान आळवत 'जे का रंजले गांजले' त्यासी म्हणे जो आपुले' अशी भक्ती गीते धीरगंभीर आवाजात ऐकू यायची. बाबूजींचं 'समाधी साधन संजीवन नाम' हे ६ वाजून २० मिनिटांनी हटकून असायचंच. शाळेच्या दिवसात क्लासला जाण्यासाठी हे गाणं झालं की सायकलचं पायंडल मारायचं. घड्याळ कधी बघावं लागत नव्हतं. बऱ्याच वेळा घड्याळ असायचं पण नाही. सगळं काही चालायचं ते रेडिओवरच.

सकाळी चहाचा घोट घेत असताना ६.५५ ला संस्कृत बातम्या चालू व्हायच्या ते आम्हाला काही कळत नव्हतं पण दररोज ते सुरुवातीचं पठण ऐकून 'इयं आकाशवाणी। संप्रति वार्ताः श्रूयन्ताम्। प्रवाचकः बलदेवानन्द सागरः।'' हे आमचे पाठ झालं होतं. पुढे आम्ही कॉलेजला जाईपर्यंत किती तरी वर्षे तोच आवाज होता.

संस्कृत कुणाला काही समजत नव्हते पण, आतून आईचा आवाज मात्र यायचा... संस्कृत बातम्या झाल्या रे.. आंघोळीला जा.

सकाळी सात वाजता पाच मिनिटाच्या हिंदी बातम्यांच्या सुरुवातीला बातमीदार एक आवंढा गिळून – 'ये (थोडा श्वास घ्यायचा, मग) आकाशवाणी है । अब सुब्रम्हण्यम स्वामी से समाचार सुनिये...।'

बरोबर सात वाजून पाच मिनिटांनी घोषणा ऐकू यायची.

'आकाशवाणी पुणे ! सुधा नरवणे (किंवा भालचंद्र कुलकर्णी) आपल्याला प्रादेशिक बातम्या देत आहेत ! – ठळक बातम्या.' सुधा नरवणे आणि त्यांचा आवाज आजही आठवतो. अत्यंत स्पष्ट आवाजात आणि १० मिनिटात त्यावेळचे जग समजायचे.

सकाळी ८ वाजता हिंदीतून मग ८ वाजून १० मिनिटांनी इंग्रजीमधून दिल्ली केंद्रावरच्या बातम्या प्रसारित व्हायच्या. नंतर साडे आठ वाजता दिल्ली केंद्रावरुन प्रसारित होणारे 'मराठी बातमीपत्र हे दत्ता कुलकर्णी, नंदकुमार कारखानीस, माधुरी लिमये, मृदुला घोडके त्यावेळी द्यायचे. आजही त्यांचे आवाज कानात बसलेले आहेत.

८ वाजून ४० मिनिटांनी कधी नाट्यसंगीत तर कधी चित्रपट संगीत तर कधी भावगीते प्रसारित होत असत.

अकरा वाजता आकाशवाणी मुंबई ब केंद्रावरून 'कामगार सभा' हा चित्रपट गीतांचा कार्यक्रम लागायचा. त्याकाळी 'शाहीर दादा कोंडके' यांचं लोकप्रिय झालेलं 'मळ्याच्या मळ्यामध्ये कोण गं उभी' अन् 'अंजनीच्या सूता तुला रामाचं वरदान अन् एक मुखानं बोला बोला जय जय हनुमान' ही गाणी हटकून असायची. ऐकून ऐकून आम्हा पोरांची ती गाणी तोंडपाठ झाली.

दुपारी बारा वाजता बाई माणसाची घरातील सर्व आवरा आवर झाली की, 'माजघरातल्या गप्पा' हा कार्यक्रम चालू झाला की त्या प्रत्येकाला त्या

गप्पा आपल्या घरातल्या गप्पा वाटायच्या. 'सरु बाईंचा सल्ला' हा घरातील वडिलधाऱ्या मंडळीने दिलेला सल्ला वाटायचा.

संध्याकाळी पुन्हा रेडिओचा ताबा मिळायचा. साडेसहा वाजता 'कामगारांसाठी' असा पुन्हा एक विरुंगळयाचा कार्यक्रम लागायचा. त्यात लोकसंगीत, लोकगीतं, कोळीगीत, भारुडे अशा गाण्यांचा भरणा असायचा. शाहीर विठ्ठल उमप, अनंत फंदी यांची कितीतरी गाणी त्यावेळी ऐकलीय. 'बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडू नको – संसारामधी असा आपला, उगाच भटकत फिरु नको' हे गाणं आजही कानात गुणगुणतय !

संध्याकाळी साडेसहाला शेतकऱ्यांच्यासाठी दररोज एक 'आपली शेती' नावाचा अर्ध्या तासाचा प्रायोजित कार्यक्रम लागायचा. लहान असल्यानं शेतीतील कार्यक्रमाचं काहीच कळायचं नाही पण, 'झुळझुळ वाणी... खेळवा पाणी, आणायचं कुणी... सांगतो राणी... फिनोलेक्सनं आणलं पाणी, शेत पिकली सोन्यावाणी.. फिनोलेक्स' ही मध्येच वाजणारी जाहिरात बरोबर म्हणायचो.

संध्याकाळी सात वाजता मुंबई केंद्रावरुन मराठी बातम्या लागायच्या. वृत्तनिवेदीका श्रीमती इंदुमती काळे आठवतात. बातम्यांची वेळ झाली की शेजारी पाजारी, गल्लीतले ज्यांच्याकडे रेडिओ आहे, त्यांच्या अंगणात गोळा व्हायचे अन् कधी कधी वडीलधारी मंडळी कट्ट्यावर त्या बातम्या ऐकत बसायचे... मग गल्लीपासून ते अमेरिकेच्या अध्यक्षापर्यंत चर्चा व्हायची. अमेरिका आणि रशियाने काय करायला हवे याचाही सल्ला दिला जायचा वडीलधाऱ्या मंडळीकडून.

रात्री ८ वाजता दिल्ली केंद्रावरच्या इंग्रजीमधून क्रीडा, बातम्या असायच्या आणि बरोबर ८ वाजून ५ मिनिटांनी दिल्ली केंद्रावरच्या मराठी बातम्या आणि 'आकाशवाणी दत्ता कुलकर्णी (किंवा नंदकुमार कारखानिस) आपल्याला बातम्या देत आहेत.' असा दमदार आवाज घरात घुमायचा.

घरातील लोकांची जेवणं व्हायची तोपर्यंत नऊ वाजलेले असायचे मग 'नभोवाणी आणि मित्रमंडळ सादर करत आहे एक नाटिका' असा एक श्रवणीय अर्ध्या एक तासाचा नाट्यप्रयोग लागायचा. ते ऐकत असताना आपण प्रत्यक्ष ते नाटक अनुभवतोय असं भास व्हायचा.

तोपर्यंत घरात/अंगणात गाद्या, गिरद्या, गोधड्या, वाकळ असं काही बाही टाकून झोपण्याची तयारी केलेली असायची अन् नेमकं त्याच वेळी जुन्या हिंदी गीतांचा कार्यक्रम चालू व्हायचा... मग मोकळ्या हवेत अंथरुणावर लोळत पडत ही सुमधुर श्रवणीय गाणी ऐकत कधी झोपी जायचो ते कळत पण नसायचं !

असाच रात्री ९ वाजता प्रसारीत होणारा आणखी एक साप्ताहिक लोकप्रिय कार्यक्रम मराठी चित्रपट संगीताचा कार्यक्रम 'आपली आवड' की ज्यात पत्राने लोक मराठी गाणी आकाशवाणी केंद्राला कळवायचे आणि मग ज्या गाण्यासाठी जास्त पत्रं आली ती गाणी मग आपलं नावं घेवून त्या कार्यक्रमात लावली जायची ! सूर्य मावळतीला गेल्यावर संध्याकाळी 'सांजधारा' म्हणून एक भावगीतांचा कार्यक्रम चालू व्हायचा. 'अशी पाखरे येती, आणि स्मृती ठेवुनी जाते' किंवा 'संथ वाहते कृष्णामाई, तीरावरल्या सुख दुःखाची जाणीव तिजला नाही. संथ वाहते कृष्णामाई' ही आणि अशी अनेक अरुण दाते आणि सुधीर फडके यांनी गायलेली भावगीते आजही मनात घर करून उभी आहेत !

असाच एक साडेनऊ वाजता रेडिओवर 'गम्मत–जम्मत' हा लहान मुलांचा कार्यक्रम लागायचा. 'गम्मत जम्मत. या या या गम्मत जम्मत.

ऐका हो गम्मत जम्मत. या या या ढिण्चॅक ढिण्ण, ढिण्चॅक ढिण्चॅक ढिण्ण' अशी त्या शीर्षक गीतानं कार्यक्रमाची सुरुवात व्हायची. त्यातलं शेवटचे 'गम्मऽऽत जम्मऽऽत' हे शब्द कानावर आले की आम्ही मुलं हात वर करून ते शब्द त्या रेडिओ सोबत म्हणायचो !

शनिवारी रात्री साडेनऊला नाटकांचे, कादंबरीचे नभोवाणी रुपांतर चांगले असायचे.

तेव्हा रेडिओवर जास्त करून मराठी कार्यक्रमच ऐकले जायचे. मराठी सिने संगीत, शास्त्रीय संगीत, श्रुतिका, चर्चा, कीर्तन, बाजारभाव इत्यादी इत्यादी. पैकी रात्रीची 'टेकाडे भाऊजींची' श्रुतिका, रात्रीची 'आपली आवड' हे अगदी न चुकवायचे कार्यक्रम. हिंदी कार्यक्रम ऐकायचेच नाही असेही नाही. दुपारी अडीच वाजता विविधभारती, त्यातील 'फौजी भाईयों की खिदमत में' सादर होणाऱ्या कार्यक्रमात येणाऱ्या मोठमोठ्या निर्माते, दिग्दर्शक, हिरो-हिरॉइन्स वगैरे ग्लॅमरस व्यक्तींना प्रत्यक्ष 'ऐकायला मिळायचं. गाणी तर सुंदर असायचीच.'

दर बुधवारी रात्री ८ वाजता रेडिओ सिलोनवर लागणारी, 'बिनाका गीतमाला' हा कोणतं गाणं या आठवड्यात किती नंबरला आहे... याबाबतचा एक तासाचा कार्यक्रम लागायचा. त्यात ते अमिन सायानीचे निवेदन..'भाईयों और बहेंनो, तो चलो देखते है, इस हप्ते में पायदान नंबर चार पे कौनसा गाना है.'

हे असं त्यांनी म्हटलं की, आमच्या घरामध्ये त्या गाण्यावरून पैजा लागायच्या, कोण जिंकतंय कोण हरतंय यापेक्षा आपला अंदाज बरोबर आल्याचा आनंद अधिक असायचा. तो अमीन सयानी म्हणजे प्रत्येकाला आपल्या घरातील माणूस वाटायचा. इतकं जिवंत ते सादरीकरण कानाला अन मनाला भावायचं ! बिनाका गीतमालाचा वार्षिक कार्यक्रम म्हणजे गाण्यांची मेजवानीच. आमच्या काळातल्या गाण्यांशी आमचं भावविभोर विश्वनिगडीत होतंच की ! आम्ही कागद-पेन घेऊन ती यादी लिहून काढायचो. वर्षभरातल्या आपल्या आवडत्या गाण्यांशी ती ताडून पाहायचो. अमीनभाईंचा आश्वासक, आपलासा वाटणारा आवाज, ती गाणी ! ते गायक ! व्वा ! असे दिग्गज कलाकार ज्या शतकात जन्मले, त्याच शतकात आपलाही जन्म झाला आहे, या सुखद जाणिवेनं आजही किती कृतकृत्य वाटतं. रात्री सव्वानऊला 'ईगल प्लास्क' प्रस्तुत इन्स्पेक्टर ईगल ह्यांची विनोदी मालिका लागायची तर 'हवामहल' कार्यक्रमात वेगवेगळ्या पुरातन ऐतिहासिक वास्तू स्वतः इतिहास कथन करायच्या.

फौजी भाईयों की पसंद के फिल्मी गाने ! जिवाचा कान करुन ऐकायचो. या कार्यक्रमासोबत मदमस्त गाण्यांचा जो सिलसिला सुरु व्हायचा तो थेट रात्रीपर्यंत (काय हो? ते झुमरीतलैया नेमकं कुठल्या राज्यात आहे बरं !) सर्वचजण 'बेला के फूल' हा कार्यक्रम संपताच निद्रादेवीची आराधना करायचे आणि सरतेशेवटी रेडिओ बंद व्हायचा.

**

**सुविचार**

*जिवंत राहण्यासाठी जेवढी अन्न आणि पाण्याची गरज आहे, तेवढीच जीवन जगताना स्पर्धक आणि विरोधक यांची गरज आहे. स्पर्धक आपल्याला सतत गतिशील आणि क्रियाशील बनवितात. विरोधक कायम आपल्याला सतर्क आणि सावधानी बनवितात आणि हे दोघे मिळून आपल्या प्रगतीला कायम पोषक वातावरण तयार करतात. या दोघांना निर्माण करायला तुम्हाला कष्ट करावे लागत नाही. 'समाज' फुकटात यांना तुम्हाला देऊन टाकतो. त्यांच्यावर चिडू नका, त्यांचे कायम स्वागत करा. कारण, त्यांच्याशिवाय तुमचे जगणे अधुरे आहे.*

**- रॉबर्ट आईनस्टाईन**

# राजापूरचे हे महत्त्व आपल्याला माहित आहे का ?

**श्री. श्रीकांत हर्डीकर,** मुंबई * मो. ९८२०६८७२२४

पं. रघुनाथभट्ट गणेशभट्ट नवाथ्ये... पूर्वी केवळ पहिले नाव देण्याची पद्धत होती. म्हणून श्री रामदासांच्या पंचायतनात त्यांचे 'रघुनाथ' एवढेच नाव मिळते !

हे अनेक शास्त्रामध्ये प्रवीण होते. स्वयंसिद्ध, विवेकी, प्रतिभावान होते. घरे-मंदिरे बांधकामाचे विशेष ज्ञान त्यांना होते !

चाफळच्या राममंदिराच्या बांधकामाचे आयोजन व उभारणी श्री रामदासांनी यांचेवरच सोपविली ! त्यांचेकडून करवून घेतली. भू गावच्या पं. अनंतभट्ट देव या पंडित श्रेष्ठांकडे त्यांचे अध्ययन झाले. हे 'देव' तर मूळचे 'नवाथ्ये'च होते. त्यांचे नाव पं. दामोदरभट्ट देव.

योगविद्या व अध्यात्मशास्त्रामधे यांची विलक्षण गति होती. लोक, त्यांना देवासारखेच मानीत असत. विजापूरचा आदिलशहा याच्या ताब्यात कोकणचा राजापूर, लांजा वगैरे भाग होता.

यांचा आशीर्वाद लाभावा म्हणून तो धनगराच्या वेषामध्ये या देवांच्या दर्शनासाठी आला होता. कारण, नको असलेल्या व्यक्तीचे दर्शन करण्याची पाळी आली तर ते योगसाधनेने गुप्तही होत असत. रामदासांच्या समाधीनंतर, रघुनाथांचा उदय काहींना नको होता. तंजावरहून आलेल्या भोसले राणीसरकार, यांनी त्यांची योग्यता जाणून एकूण परिस्थिती पाहून आग्रहाने त्यांना तंजावरला नेले. तिथे त्यांच्या प्रतिभेला बहार आला. विस्कळित असलेल्या अनेक धर्माचरणात तसेच, याज्ञिकी प्रयोगांमधे, त्यांनी अधिकाराने, एकवाक्यता आणली.

पुण्याहवाचनासह अनेक धार्मिक प्रयोगांची आखणी त्यांनी करून ठेवली आहे. त्यांनी सुमारे सात-आठ ग्रंथ लिहिले होते. त्या ग्रंथांमधे, 'भोजनकुतूहलम्' हा एक विशेष ग्रंथ, विभिन्न रुचींचे भोजन-पदार्थ, करसे बनवावेत याचे मनोहारी वर्णन संस्कृत भाषेत केलेले आहे. त्या ग्रंथाचे पुनःप्रकाशन, श्री रामदेवबाबांनी, इंग्लिश भाषांतरासह केलेले आहे.

भोजनासाठी लागणारे, एकूण सतरा प्रकारचे पाणी कसे तयार करावे. याविषयाची माहिती यात आहे. सतराव्या शतकाच्या अखेरच्या काही दशकांमधे या ग्रंथाचे लेखन झाले असावें.

आमच्या रक्तात घट्ट रुतून बसलेल्या 'मला काय त्याचे ? असेल मोठा !' या अशा परगुणांचा द्वेषच करण्याच्या जडलेल्या वृत्ती-प्रवृत्तीमुळे, अशा प्रातस्मरणीय ठरलेल्या, अनेक विद्वान तसेच सद्गुणी व्यक्तींना आपण झटकन विसरुन जातो व हेच दाखवितो की, दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीचे विशेष गुणही दुर्लक्षित ठेवणारे असे आपण मंदबुद्धीचे व करंटे आहोत.

दामोदरभट्ट देव यांचे समाधिमंदिर, भू, ता. राजापूर येथे सप्रे यांच्या बागेत दोन नद्यांच्या संगमावर आहे. छोटेसेच पण मनोहारी, रम्य ठिकाण! याच 'देव' आडनावाच्या घरातून, भारताच्या परराष्ट्र खात्यातील भूतपूर्व सेक्रेटरी तसेच नेपाळ व जर्मनीमधले भारताचे भूतपूर्व हायकमिशनर, 'श्री. अरविंद देव' तसेच कोचीनमधले अत्तर व परफ्यूम क्षेत्रातले प्रख्यात 'देव' पुढे आले. साहित्यिक, समाजसेवक तर अनेक आहेत.

जवळच्याच तेरवण या गावात 'विसाजीपंत बिनीवाले' या एका धाडशी प्रतापी अशा मराठी रियासतीच्या सेनापतीचा जन्म झाला ! पानिपतवर

मराठी सत्तेचा पराभव व अपमानाचा बदला त्यांनी अब्दालीचा पूर्ण निःपात करून घेतला. त्यांचे मूळ आडनाव होते चिंचाळकर.

भू या गावाला अगदी लागूनच असलेल्या 'कोतापूर' या गावातून, भारतरत्न पं. गोविंद वल्लभपंत पराडकर यांचे विरक्त वृत्तीचे पूर्वज, श्री जयरामपंत पराडकर, गढ़वाल या उत्तर प्रदेशाच्या निसर्गरम्य ठिकाणी जाऊन राहिले होते. यांच्यापासूनच्या सातव्या पिढीत जन्माला आलेले, विशाल उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री व वल्लभभाई पटेलानंतरचे, भारताचे गृहमंत्री म्हणून भारतरत्न श्री. गोविंद वल्लभपंत ललामभूत आहेत. शौर्य, विद्वत्ता, धैर्य, पांडित्य, दानशूर, कृतिवीरता, त्यागी स्वभाव, त्याचप्रमाणे एकाच वेळी भुक्ति व मुक्तीचे साक्षात्कारी साधकांची विपुल संख्या, त्याचवेळी अस्सल ओजस्वी व तेजस्वी रुप घेऊनच जन्मलेल्या, अनेक गुणानी मंडित लोकांचा हा 'भू-पंचक्रोशीचा' प्रदेश आहे.

**

*''शांत पाण्यात स्पष्ट प्रतिमा पाहत असताना, कुणी पाणी ढवळून वलय निर्माण केलं, तर गोंधळून जावू नका. पाणी पुन्हा शांत होण्याची वाट पहा. प्रतिमा पुन्हा स्पष्टच दिसेल. दैनंदिन कामात असे अडथळे येतच असतात. म्हणून खचून जायचं नसतं. थोड्या वेळात त्याच कामात रमायचं असतं. कुणीतरी पुढे गेला म्हणून द्वेष करत बसण्यापेक्षा आपण मागे का राहिलो हा विचार करा आणि चालत रहा. स्पर्धा स्वतःशी करा, जगाशी नाही. आयुष्य खूप सुंदर आहे. धनदौलत कोण कोणाला देत नाही. फक्त माणुसकी जपत रहा. प्रसंग कोणताही असो... सुखाचा की दुःखाचा त्यासाठी कोणी हाक दिली तर प्रेमाने साथ द्या.''*

## निवृत्ती नंतर

पहाटे उठावे स्वतःच चहा करावा
झोप मोडेल असा आवाज नसावा

प्राणायम करावा योग साधावा
हाडे मोडतील इतपत तो नसावा

फिरायला जाणे प्रमाणात असावे
सोबत मोबाईल खिशात असावा
पडाल कोठे तर नक्की सापडाल

आंघोळीला तुमचा नंबर शेवटचा
न रागावता गोड मानून घ्यावा

किराणा भाजी पोस्ट बँक
फिरणे समजून आनंद घ्यावा

ज्येष्ठ मंडळीचा कट्टा असावा
पण त्यात कुठला वाद नसावा
मनमुराद गप्पांचा आनंद घ्यावा

लिहिणे, वाचणे, वाजविणे गाणे
एखादा तरी छंद नक्की असावा

मी कोणी मोठा होतो हे विसरा
मोठेपणाची झुल खुंटीवर ठेवा

मित्रमंडळी सगे-सोयरे नातीगोती
लक्षात ठेवा हीच कामाला येती

आता काय व्हायलं ? म्हणू नका
कुणाला उपदेश करत सुटू नका

पर्यटन सिनेमा नाटक तमाशा
राहून गेले असेल तर उरका
पत्नीला सोबत घ्या, विसरु नका

प्रकृती आणि पैसा येती कामा
या दोघांना सांभाळून ठेवा

संध्याछाया भिववती हृदया
हे विसरण्याची साधावी किमया.

# जेवणाचे ताट/पान कसे वाढावे ?

डॉ. हेमंत सहस्त्रबुद्धे ऊर्फ कलादास * मो. ७६२०७५००३४



महाराष्ट्रीयन किंवा मराठी पद्धतीचे जेवण कसे जेवावे? आणि खरे म्हणजे ते कसे वाढावे आणि तसेच का वाढावे ? ही पोस्ट अवश्य अवश्य वाचा मित्रांनो... माहिती आणि आनंद दोन्ही मिळेल.

आपल्याकडे सण, उत्सव, लग्नसोहळा, मुंज, बारसे अशा कार्यक्रमांना आपले ताट अगदी चारी बाजूंनी वाढून मस्त सजवले जाते. काय ते केवळ मस्त दिसावे म्हणून तसे असते ? काय ते फक्त पाहुण्यांना खुश करण्यासाठी तसे असते ? काय ते यजमानांना आपली श्रीमंती जगाला दाखवायची असते म्हणून तसे असते ?

नाही. त्यात शास्त्र आहे. आपल्याकडे आलेल्या पाहुण्यांना खऱ्या अर्थाने शरीराच्या सर्व आवश्यकता भागवणारे अन्न मिळावे हा हेतू त्यात आणि या गरजा भागवताना त्याला जेवणाचा तृप्ती देणारा अनुभव सुद्धा आला पाहिजे हा या मागचा हेतू आहे. बऱ्याच ठिकाणी केवळ संबंध टिकवायला म्हणून हजारो लोकांना जेवायला घालताना भाताचा ढीग, वर किंचित ओतलेले वरण किंवा फोडणीचे वरण, बुंदीचे किंवा कसल्या तरी अतर्क्य पदार्थापासून बनवलेले लाडू, चपात्यांची उर्फ रोडग्यांची थप्पी आणि त्याच्या बरोबर कालवण म्हणून एखादी तिखटजाळ भाजी आणि काळे वाटाणे वगैरेची उसळ... आणि झालेच थोडे पापड, कुरडया वगैरे असले उरकलेले भोजन असते ते खरे भोजन नव्हे. हे उत्तम जेवण नव्हे.

आपल्याला जेवणातून पिष्टमय पदार्थ, प्रोटीन्स, स्निग्ध पदार्थ (वसा, Fats, चरबी, तूप, तेल, मेद) विटामिन्स आणि क्षार अथवा मिनरल्स मिळावे लागतात. बरे आयुर्वेदाच्या दृष्टीने बघावे तर त्यात गोड, आंबट, तिखट, खारट, कडू आणि तुरट हे षड्रस असावे लागतात. तर ते परिपूर्ण भोजन होते. ते सुग्रास असायला हवे. म्हणजे त्याचे घास घेताना आनंद व्हायला हवा. ते शुद्धाता पाळून, उत्तम निवडलेल्या पदार्थांचे शिजवलेले असायला हवे. ते चावता येईल, चोखता येईल, चघळता येईल, पिता येईल, खाता येईल अशा विविध प्रकारचे असायला हवे. तर त्यातून आनंदही मिळतो.

आपल्या मराठी जेवण पद्धतीत किंवा आपण आर्य सनातन वैदिक धर्म पद्धतीत म्हणू या.. जेवणाचे जे ताट वाढले जाते ना मित्रांनो ते असे अगदी शास्त्रशुद्ध असते. तरी शास्त्रशुद्ध असले म्हणून बोअर किंवा कंटाळवाणे नसते. हो.. ताटाकडे पाहिल्यावरच तोंडाला पाणी सुटते. अहो साहेबा बघावे सुद्धा लागत नाही. स्वयंपाकघरातून भाताचा सुवास... अहाहा... आमटी किंवा भाजीसाठी हळद, हिंग, मोहरी, मिरच्या, कढीपत्ता वगैरे मसाला फोडणीला टाकले की तेलातून तो असा काही उचंबळून येतो की जणू त्याला म्हणायचे असते की अरे माणसांनो आमच्यामुळे या पदार्थांना भन्नाट चव येतेय पण ते आम्हीच खाऊ शकत नाही राव. म्हणून जरा बाहेर येऊन चव बघतात जणू... आमटी म्हणजे (जी विदेशात इंडियन करी म्हणून मिरवते आहे तीच ही... इंडियन करी, इंडियन सारी, इंडियन नारी, इंडियन हरी, इंडियन वारी (पंढरपूरची वारी

आणि वारकरी सुद्धा) हे सारेच फॉरेनमध्ये लोकप्रिय आहे बरं का पठ्ठे बापूराव) मिरची ही तशी स्वभावाने दैत्य म्हणजे राक्षस... अगदी तिखट... ती कानामागून येवो अथवा पुढून ती तिखटच असते आणि असावी तर मजा... पण हीच मिरची, कोथिंबीर कापून काढले तरी हसणाऱ्या कैरीच्या फोडी, गोबऱ्या गालांसारखे टोमॅटो यांच्या संगतीत आली की मग मात्र ती पदार्थाळते आणि थोडी सौम्य होते आणि तोंडाला झरे फोडते. आमटीत चिंचेचा कोळ म्हणजे पाण्यात भिजवून पिळून काढलेला गर घातला की तो शाकाहारी लोकांच्या आहारात असलेले लोह पचवायला मदत करतो. पदार्थाला एक झक्कपैकी आंबट चव आणतो. याला उत्तम साथ देतो तो गूळ. २१ प्रकारचे क्षार, लोह आणि उर्जा पुरवणाऱ्या या गोड गुळामुळे आंबट गोड पदार्थाचे हे मिश्रण अगदी क्रिकेटच्या सामन्यात उजव्या हाताने फलंदाजी करणारा आणि डावखोरा फलंदाज यांची मस्त जोडी जमावी आणि त्यांनी प्रतिपक्षाची भंबेरी उडवून डाव सावरावा तसे अगदी तस्से पदार्थाला एक मिश्र आणि मस्त चव आणतात. भात, पोळी, भाकरी या सर्वातून पिष्टमय पदार्थ मिळतात. त्यातून शरीराला काम करायला उर्जा मिळते. पोट भरल्याची जाणीव आणि समाधान होते. क्षार म्हणजे मिनरल्स आपल्या शरीरात विजेचे वहन व्यवस्थित, सुचारु पद्धतीने व्हावे म्हणून आवश्यक असतात. नव्हे त्यांचा त्यात सहभाग असतो. आपले विचार करणे, काम करणे, हालचाल करणे हे सगळे या विजेमुळे शक्य होते. या विजेलाच आयुर्वेद वात किंवा वायू म्हणतो. पालेभाज्या, फळभाज्या, फळे वगैरे भिन्न भिन्न पदार्थातून आपल्याला विटामिन्स मिळतात. तुपातून शरीराला संकटकाळी उपयोगी पडणारी उर्जा, स्निग्धता, मऊपणा, आकार, सौंदर्य मिळते. प्रोटीन्स म्हणजे प्रथिनांमुळे शरीराची जडणघडण होते. डाळी, स्निग्ध पदार्थ पचायला तेल आणि तूप आवश्यक असते. पण ते पिष्टमय पदार्थांबरोबर मात्र पचायला थोडे जड जाते बरे का काका. विवेकानंद म्हणतात की आपण जे वरण खातो त्यातले वरचे पाणी फक्त आपण घ्यावे बाकीचा जाड डाळीचा भाग घोड्याला घालावा. तो पचायला जड असतो. एका वरण-भात-तूप-लिंबू आणि मीठ या संयुक्त पदार्थातून वर उल्लेख केलेले सगळे घटक आपल्याला मिळतात.

आपल्या या पद्धतीत ताट कसे वाढतात ते आपण पाहू या आता...

सुरुवात डाव्या हातापासून करु या. ताटाच्या बाहेर डाव्या हाताला पाण्याचे भांडे ठेवलेले असते. कारणे दोन... एक म्हणजे उजव्या उष्ट्या हाताने आपल्याला ते उचलावे लागू नये. दुसरे कारण त्यात एक संदेश देणे हा आहे. डाव्या हाताला ठेवलेल्या गोष्टी अथवा पदार्थ कमी सेवन करायचे आहेत. जेवताना जास्त पाणी प्यायले तर पाचक रस पातळ होऊन वाहून जातील आणि पचन होणार नाही. म्हणून जेवताना पाणी कमी प्या हा संदेश देण्यासाठी पाण्याचे भांडे डाव्या हाताला असते. पानामध्ये डाव्या हाताला लोणचे, चटण्या, मीठ, पंचामृत हे पदार्थ असतात. आंब्याचे लोणचे वर्षभर टिकावे म्हणून भरपूर मीठ आणि तेल घालून बनवलेले असते. त्यामुळे ते जर जास्त खाल्ले तर रक्त पातळ आणि खराब होते आणि त्वचेचे विकार जडतात. पित्त होते. पंचामृत हे चिंचेचा कोळ, गुळ, हिरवी मिरची, तीळ, शेंगदाणे, खोबऱ्याच्या चकत्या या मिश्रणाला साजूक तूप आणि जिऱ्याची फोडणी देऊन बनवलेले असते. चव काय रावडी असेल हे काय मी सांगायला हवे ? पण तेही जास्त खाऊन चालत नाही. नाहीतर पित्ताचा आगडोंब उसळेल म्हणून पंचामृत सुद्धा डाव्या बाजूला. चटणी मिरच्यांची असल्याने जास्त तिखट असल्याने फक्त चवीपुरती खायची असते. बोटांनी अधे मधे जिभेला जिवंत

करायला या डाव्या बाजूच्या पदार्थांचा फार उपयोग होतो. गोड पदार्थ खाताना तिटकारा आला किंवा संपवायचा असेल तर एखादे दुसरे बोट या डाव्या पदार्थांचे चाखायचे. हे डाव्या हाताला असले तरी यांची चव मात्र उजवी आणि अतिशय जहालवादी असते. मीठ तर चवीपुरतेच खावे. पापड हे पूर्वीच्या काळी भाजून खाल्ले जात. ते शुष्क असल्याने जाड-स्थूल व्यक्तींना हितकर पण बारीक व्यक्तींना त्रासदायक. तळलेले पापड पचायला जड आणि तहान वाढविणारे. हल्ली पाणी जास्त पिऊन जेवण कमी जावे म्हणून काही वाढपी (त्यांना दिलेल्या आज्ञेवरून) पापड मुद्दाम जास्त वाढतात. पोह्याचे पापड हे इतर पापडांच्यापेक्षा मस्त लागतात. पण चवीत बदल म्हणून इतर पापड सुद्धा हवेतच. फक्त ते मोडताना त्याचे तुकडे सर्वत्र उडतात. नेमके त्याच वेळेला आपल्याकडे कोणीतरी रोखून बघत असते. तर पापड आणि कुरडया ताटात डाव्याच बाजूला पण किंचित आत असतात. पोळ्या या उत्तम गव्हाच्या आणि छान आकारातल्या पांढऱ्या शुभ्र हव्या. त्यांना पुरेसे तेल अथवा तूप लावलेले हवे. मसालेभातातले काजू आधी खाऊ की मसालेभात असे व्हायला हवे. लाडूवातले वरून टोचलेले बेदाणे लक्ष वेधून घेणारे हवेत. तर त्यांची चव आपण बघणार...

मग ताटात समोरच्या बाजूला ज्या कोणत्या शिजवलेल्या असतील त्या त्या विविध प्रकारच्या भाज्या वाढल्या जातात. उजवीकडे अळवाचे फदफदे, आमटी, सार (टोमॅटोचे), ताकातली कढी, सोलकढी (कोकम आणि नारळाचे दुध यापासून बनवलेली. यात आवडीप्रमाणे लसूण घालतात.) मठ्ठा (हा ताकाला कोथिंबीर आणि अगदी थोडी मीठ-मिरची लावून बनवलेला असतो.) रसम (हा दक्षिणी पदार्थ चिंचेचा कोळ घालून बनवला जातो), (हल्ली कुठे कुठे सूप असते. पण ते भारतीय जेवणाचा हिस्सा नव्हे.) हे पदार्थ जेवताना अधेमधे भुरकायचे असतात. त्याचा आवाज झाला म्हणजे यजमानाला आपले पाहुणे मनापासून जेवताहेत हे समाधान मिळते. पोळी, भात, मसालेभात हे पदार्थ आपल्या अगदी समोरच मध्यात असतात. तेच आपले मुख्य जेवण असते. अळवाचे फदफदे, आमटी हे पातळ पदार्थ भात बागायती जमिनी शेतकरी त्याच्याकडे असलेल्या भरपूर पाण्याने जशा मुबलक भिजवतात तसे भातावर ओतून भात अगदी त्याच्या मऊ शिताला हसायला येईल इतका भिजवून ओरपावा. भात आणि अळवाचे फदफदे खाताना खरी गंमत त्यातल्या दाताखाली येणाऱ्या शेंगदाण्यांमध्ये असते. उजव्या हाताला श्रीखंड, गुलाबजाम अनेक गोड पदार्थ असतात. श्रीखंड नेहमी पुरीचा द्रोण बनवून त्यात मोठ्या शिताफीने उचलत बरोबर तोंडात घास (आपल्याच) घालत खावे. अधेमध्ये ते नुसते चाटायला सुद्धा परवानगी असते. हां... मात्र तुम्ही पट्टीचे जेवणारे नसाल तर पक्वान्ने लवकर संपवू नका. नाहीतर ज्याच्याकडे कार्य आहे तो किंवा त्याचे घरचे वाढपी कमांडोज तुमच्यावर अक्षरशः झडप घालून तुमचे हात बाजूला करून आग्रहाने वाढतील. नंतर एक वामकुक्षी काढायची व्यवस्था असेल तर ठीक आहे नाहीतर दोन घास कमीच जेवा हो पंत. काही महान हस्ती या श्रीखंडात साजूक तूप घालून खातात. तर काही खवय्ये भात आणि आमरस मिसळून खातात. 'गुलाबजाम' 'जाम' म्हणजे खूप खाल्ल्यावर त्यातील खव्याने पोट 'जाम' होते अर्थात गच्च होते. फुगते आणि दुसऱ्या दिवशी सकाळ सरल्यानंतर हातात 'गुलाब' धरायची सुद्धा शक्ती रहात नाही महाराजा. जिलबीची कडी अरे जरा कमी जेव असे सांगणाऱ्या मनाच्या दाराला कडी घालून मठ्ठ्यामध्ये बुडवून मस्त हादडावी. अर्थात एखाद्या मठ्ठ माणसाने जिलबी बनवलेली असेल तर संपलेच समजा सगळे. (कोणाला सांगू नका बरे. पण जिलबी शिळी

झाल्यावर दुसऱ्या दिवशीच जास्त चांगली लागते. म्हणून खिशात एखादी प्लास्टिक पिशवी ठेवून रस पाघळू न देता खिशातून घरी नेऊन दुसऱ्या दिवशी खाल्लीत ना तर मज्जा येईल बरं का ! पण आपापल्या जबाबदारीवर हे करावे प्रत्येकाने. नाहीतर जिलेबी, लाडूसारखे गोड पदार्थ नुसते एकएकटे खाण्यासाठी असतात तर पाकासहित असलेले किंवा जास्त ओलसर असलेले गुलाबजाम, श्रीखंड सारखे पदार्थ पोळी किंवा पुरीला लावून खाण्यासाठी असतात. करंज्यांच्या कडा उत्तम कातरलेल्या असतील तर त्या जंजीर मधल्या अमिताभच्या सरळ तेलकट केसांसारख्या न दिसता डॉनमधल्या अमिताभच्या कानावर दिलखेचक कल्ले दिसावे तशा दिसतात. करंज्या नुसत्या बाता मारणाऱ्या लोकांसारख्या आतून पोकळ नकोत. दक्षिणी नट्यांसारख्या अंगापिंडाने भरलेल्या हव्यात.

भिन्न भिन्न चवींच्या विविध भाज्या पोळीबरोबर लावून भरपूर खा. तोंडातली लाळ ही फक्त क्रिकेटमधल्या बॉलर्सना बॉल चमकावण्यासाठी नसून ही लाळ अन्नात मिसळून अन्न व्यवस्थित पचले, हजम झाले की आपल्या शरीराला सुद्धा चमकावते. त्यामुळे प्रत्येक घास नीट चावून खाणे आवश्यक आहे. आयुर्वेदानुसार गाय जितक्या वेळात पाणी पिते (ती बादलीभर पाणी पिते) तेवढ्या वेळेत पण नीट चावून आपले जेवण उरकले पाहिजे. आयुर्वेद म्हणतो की गोड पदार्थ आधी खा आणि तिखट नंतर. म्हणजे तिखट पदार्थांमुळे गोड पदार्थ पचतील. आपण नेमके स्वीट डिश या परदेशी कन्सेप्टच्या आड आपल्या गोड पदार्थांमुळे आपल्या पोटाचे डेझर्ट म्हणजे वाळवंट बनवून ठेवतो. हे विदेशी लोक डेझर्ट म्हणून आयस्क्रीम किंवा इतर गोड पदार्थ जेवण झाल्यावर खातात. हाताने जेवण जेवल्याने आपल्या हातातील आणि शरीरातील लहरी जेवणात मिसळतात आणि ते अन्न आपल्या शरीरात म्हणजे पोटात जाण्याआधीच त्यांना हस्तांदोलन अथवा शेकहॅण्ड करून त्याची ओळख करून घेऊन मग शरीराकडे पाठविले जाते. मग शरीर ते आनंदाने स्वीकारते. ताटाभोवती घातलेली रांगोळी भरतनाट्यम, कुचीपुडी, कथ्थक, कथकली वगैरे वगैरे नृत्य करणाऱ्या सुंदर नृत्यांगनेच्या हावभावाप्रमाणे आपले लक्ष ताटाकडे वेधून घेते. आजूबाजूला लावलेल्या सुगंधित उदबत्त्या एखाद्या कसलेल्या वकिलाप्रमाणे या जेवणाची तरफदारी करत असतात.

थांबा आता ताटाभोवती चित्राहुती घालायच्या आहेत... चित्राय स्वाहा... चित्रगुप्ताय स्वाहा... यमाय स्वाहा... यमदुताय स्वाहा... सर्वेभ्यो भूतोभ्यो स्वाहा... आता घास घ्यायचे आहेत मंत्र म्हणत... या आहुती आहेत आपल्या पंचप्राणांना... प्राणाय स्वाहा... अपानाय स्वाहा... व्यानाय स्वाहा... उदानाय स्वाहा... समानाय स्वाहा... ब्रह्मणे स्वाहा... गोविंद म्हणत पानात कडेला छोटा घास काढून ठेवला... आता... करा मग सुरुवात... पण आधी हे म्हणा... त्याचा अर्थ लक्षात घेत म्हणा...

*वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे*
*सहज हवन होते नाम घेता फुकाचे*
*जीवन करी जिवित्वा, अन्न हे पूर्णब्रह्म*
*उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म*

असे आकंठ (म्हणजे गळ्यापर्यंत येईल इतके) आपण जेवलो की हे अन्न पचावे आणि त्यासाठी कॅल्शियमसहित अनेक द्रव्ये उपलब्ध व्हावीत म्हणून कात, चुना, सुपारी, लवंग, वेलची, खोबरे, गुलकंद आणि अन्य इष्ट पदार्थ घातलेले पान खाल्ले की आत्मा तृप्त होतो आणि अन्नाचे पचन सुद्धा उत्तम होते.

चला, मंडळी मी जेवलो हे सारे... आता पान चघळत झोपाळ्यावर बसतोय... पुन्हा भेटू नवीन विषयासह...

(संग्राहक : **कुमार माईनकर, ठाणे**
मो. ९७२१४८९४५०)

**

# अक्षय्यतृतीयेचे महत्त्व

संग्राहक : **सौ. शुभदा गुर्जर**, पुणे ✻ मो. ८३८०२९००४५



अक्षय्यतृतीया हा साडेतीन मुहूर्तांपैकी पूर्ण मुहूर्त मानला जातो. याच दिवशी सत्य म्हणजेच कृतयुग आणि त्रेतायुग या दोन्ही युगांचा आरंभ झाला म्हणून याला युगादी असेही म्हणतात. श्रीविष्णूंच्या २४ अवतारांपैकी परशुराम हा अवतार पृथ्वीतलावर अक्षय्यतृतीयेच्या दिवशी प्रकट झाला. याच दिवशी श्रीदेव्यासांनी महाभारत लेखनास प्रारंभ केला. याच दिवशी पवित्र अशी गंगा नदी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली. अक्षय्यतृतीयेचा हा दिवस पितृपूजनासाठीही प्रसिद्ध आहे. याच दिवशी सुदाम्याने श्रीकृष्णाला मूठभर पोह्याची पुरचुंडी दिली आणि मित्रप्रेम – मित्रधर्माला अनुसरुन श्रीकृष्णांनीसुद्धा सुदाम्याला त्याच्या नळकत अपार धनसंपत्ती प्रदान केली. अक्षय्यतृतीयेलाच अन्नपूर्णेचा जन्म झाला आहे. एका अक्षय्यतृतीयेला श्रीकृष्णाने युधिष्ठिराला अक्षयपात्र दिले होते, तर एका अक्षय्यतृतीयेलाच श्रीकृष्णाने चीरहरणप्रसंगी द्रौपदीला अक्षयवस्त्र पुरविले होते. श्रीबद्रीनारायण मंदिराचे दरवाजे अक्षय्यतृतीयेच्या दिवशीच उघडले जातात. अक्षय्यतृतीया ही अक्षय सुखाची कारक आहे. या दिवशी केलेल्या जप, तप, दान पुण्याचा क्षय होत नाही. यादिवशी पंचांगशुद्धी, दिनशुद्धी पाहण्याची आवश्यकता नाही.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा पुण्यप्रद दिवस श्रीविष्णूपूजनाचा, श्रीविष्णू नामस्मरणाचा आणि श्रीविष्णू कृपेचा दिवस आहे. या दिवशी विष्णुसहस्त्रनामाची अखंड आवर्तने करावीत.

अक्षय्यतृतीयेला पूर्वजांचे स्मरण व त्यानिमित्त तर्पण, हवन, दान करावे असे म्हटले आहे. प. पू. श्रीवासुदेवानंद टेंबे स्वामींनी सांगून ठेवले आहे. विष्णुसहस्त्रनाम पठणाने आपल्या पूर्वजांना सद्‌गती मिळते आणि यासाठी अक्षय्यतृतीया इतका योग्य दिवस अन्य कोणताही नाही.

✻✻

# ५० व्या वाढदिवशी : दत्तक ५ मुली

संग्राहक : श्री. श्रीकांत हर्डीकर, ✻ मो. ९८२०६८७२२४

**दत्तक पालक योजनेचा लाभ :**

राजापूर तालुक्यातील कशेळी शाळा नं. ५ मधील उपशिक्षक सुनील भालचंद्र जायंदे यांनी आपला ५० वा वाढदिवस हा पाच मुली दत्तक घेऊन आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करून समाजापुढे आदर्श ठेवला आहे.

अनेकवेळा वाढदिवसानिमित्त पार्टी करून वारेमाप खर्च केला जातो. अनेक ठिकाणी बॅनरबाजीही केली जाते. त्यातच पन्नास, पंचाहत्तर वर्ष, साठ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अनेकांकडून मोठे कार्यक्रम केले जातात. मात्र, या सर्वाला फाटा देत जायदे यांनी समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, या भावनेतून ५० व्या वाढदिवसानिमित्त शाळेतील पाच मुली दत्तक घेत सर्वांसमोर आदर्श निर्माण केला आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, हुशार, होतकरू मुलींसाठी १५ हजार रुपयांची देणगी त्यांनी सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेसाठी जिल्हा परिषदेकडे जमा केली आहे.

या कार्याबद्दल गटशिक्षणाधिकारी श्री. भोसले, केंद्रप्रमुख श्री. जाधव यांनी त्यांचे कौतुक केले. मुख्याध्यापिका सौ. दाते, उपशिक्षक मिलिंद नार्वेकर, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

(उपशिक्षक सुनील जायदेंचा उपक्रम )

✻✻

# आयुष्याला वळण देणारी मोलाची स्वाक्षरी

डॉ. दीपक शिकारपूर, पुणे



मी 'हरिभाई देवकरण प्रशाले'त १९७५ मध्ये सोलापूरला शिकत होतो. तेव्हा 'जेटयुगातील मराठी माणूस' हा शंतनुराव किर्लोस्करांचा धडा आमच्या क्रमिक पुस्तकात होता. आमचे मराठीचे शिक्षक तपस्वी सर अगदी मनापासून शिकवत. त्या धड्यानं आमच्या पिढीच्या मानसिकतेवर मोठा परिणाम केला. त्याच काळात आवडत्या लेखांच्या स्वाक्षरी घेणं हे एक मोठं अप्रुप होतं. मात्र, कुणाच्या स्वाक्षरी घ्यायच्या हा प्रश्न होता. अखेर एक दिवशी मार्ग दिसला.

आमच्या घरी पी.डी. गुणे हे माझ्या वडिलांचे मित्र जेवायला आले होते. बोलता-बोलता मला कळलं, की ते 'किर्लोस्कर' कंपनीमध्ये मोठ्या पदावर आहेत. धीर एकवटून मी त्यांना म्हणालो, 'काका, आमच्या क्रमिक पुस्तकात एक धडा असून, तो शंतनुराव किर्लोस्कर यांनी लिहिला आहे. मला त्यांची स्वाक्षरी मिळवून द्याल का ?' गुणेकाका हसले अन् म्हणाले की, 'दीपक, ते आमच्या 'किर्लोस्कर समूहा'चे प्रमुख आहेत. योगायोगानं ते आज सोलापूरात आहेत. तू आज आठ वाजता 'सोलापूर क्लब'मध्ये वडिलांबरोबर ये आणि स्वतः त्यांची स्वाक्षरी मिळव.

मी आनंदानं उपलब्ध कपड्यांमधील सर्वांत चांगले कपडे घालून वडिलांबरोबर वेळेआधी दहा मिनिटं पोहोचलो. बरोबर आठ वाजता गुणे काका आले. एवढ्या मोठ्या व्यक्तीला पाहायचा हा पहिलाच योग होता. सूट, बोमधील गोरेपान शंतनुराव मला ग्रेगरी पेकहून जास्त स्मार्ट वाटले होते. त्यांची स्वाक्षरी घेतल्यानंतर ते मला म्हणाले, 'तुला काय व्हायचंय?' डॉक्टर किंवा इंजिनिअर मी उत्तर दिलं. यावर ते म्हणाले, 'जे काय होशील, त्यात अत्युत्तम व्हायचा प्रयत्न कर. सर्वांनी लेखन करायला हवं; त्यामुळे विचार सुस्पष्ट होतात.'

त्यांच्या या सल्ल्यामुळे लेखन करायचं बाळकडू मला तिथं मिळालं. ती ३० मिनिटं माझ्या दृष्टीने स्वप्नवत होती. पहिली स्वाक्षरी घेऊन मी बाहेर आलो होतो; पण शंतनूरावांनी माझ्या व्यक्तिमत्त्व विकासात मोठा प्रभाव पाडला होता. त्याचा मला जीवनभर फायदा झाला.

**




**दिव्य भास्कर, वडोदरा**

आयोजित **Voice of Vadodara** या स्पर्धेत सुमारे १४०० स्पर्धकांनी भाग घेतला होता. यात कऱ्हाडे ब्राह्मण संघाची सभासद

**चि. कु. अनुष्का अजीत पंडित**

हिने **Winner** चे **Title** जिंकले.

त्याबद्दल संघाच्या सर्व सभासदांच्या वतीने तिचे

**हार्दिक अभिनंदन** करीत आहोत.

# विवेकी अधिकारी

संग्राहक : संदीप कळके ✻ मो. ९८२२४४८६११

सध्या राज्यातील पोलिस दलाला वादाचे ग्रहण लागले आहे. त्यामुळे समस्त पोलिस अधिकाऱ्यांकडे संशयाने पाहिले जाऊ लागले आहे. खाकी वर्दी जणू काळ्या रंगाने झाकोळली गेली आहे. इतके काळे डाग या वर्दीला कधीच लागले नव्हते. त्यामुळे पोलिसांबद्दल बरे लिहिण्याचे दिवस संपल्यातच जमा झाले होते. अशा परिस्थितीत ठाण्याचे आयुक्त विवेक फणसाळकर यांची महासंचालकपदी बढती होऊन पोलिस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नेमणूक झाल्याची बातमी ठाणेकरांना आनंद देऊन गेली असेल, यात वाद नाही. एक सुसंस्कृत आणि संयमी अधिकाऱ्याला गमावल्याचे दुःख मात्र त्यांना वाटत राहणार.

वरील दोन विशेषणे जी आम्ही श्री. फणसाळकर यांच्या बाबतीत वापरली ती आगामी काळात वापरण्याची संधी दुर्मिळ होत जाण्याची चिन्हे चिंतेस कारण ठरणार आहे. श्री. फणसाळकर यांनी पदाशी निगडीत असलेली आब आणि प्रतिष्ठा जपली. त्यांची प्रशासनावर पकड होती. वेळप्रसंगी त्यांना कठोर निर्णयही घ्यावे लागले असणार. कर्तव्य बजावताना निःपक्ष बाणा त्यांनी जपला. त्यासाठी नाराजीही ओढून घ्यावी लागली असणार. परंतु प्रतिमा स्वच्छ असेल तर दबाव टाकणारे दहा वेळा विचार करतात.

श्री फणसाळकर यांचा कारभार पारदर्शक होता. याचा एक मापदंड असतो तो त्या व्यक्तीचा मोकळा स्वभाव. आपल्या हाताखालच्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी संवादाचे दालन उघडे ठेवले होते. हा विश्वास कमविणे तसे सोपे नसते. पोलिस दलात कोरोनासारख्या बिकट काळात सांघिक भावना जपताना कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्याची त्यांची भूमिका आश्वासक होती. गेल्या ३५ वर्षांच्या पत्रकारितेच्या काळात आम्ही अनेक उत्तम पोलिस आयुक्त पाहिले. त्या मांदियाळीत फणसाळकर हे निश्चित बसू शकतील. ठाण्याला पोलिस आयुक्तांची उज्ज्वल परंपरा आहे. ज्युलिओ रिबेरो ज्या आयुक्तालयाचे प्रथम आयुक्त होते तिथे असे चांगले अधिकारी न उपजतील तरच नवल ! डी. शिवानंद, मेंडोंसा, सामरा अशी काही नावे पटकन डोळ्यासमोर येतात.

श्री. फणसाळकर यांना जसा कर्तव्यदक्ष पोलिस अधिकाऱ्याचा लौकिक प्राप्त झाला म्हणून तशीच छाप एक व्यासंगी आणि बहुआयामी व्यक्ती म्हणून त्यांनी पाडली. समाजकारण, इतिहास, कला, साहित्य आदी विषयांवरचे त्यांचे वाचन थक्क करणारे होते. खाकीची करडी वृत्ती क्षणभर सुसंस्कृतपणाने लखलखीत आणि प्रसन्न अशी आश्चर्यकारक अनुभूती देऊन जात. त्यांच्याबरोबर अनेकदा सार्वजनिक कार्यक्रमात भाग घेण्याची संधी मिळाली. हे व्यक्तिमत्त्व किती संतुलित आहे याची प्रचिती येई. नाव सार्थक करणारा या विवेकी अधिकाऱ्यास ठाणेकर सहजी विसरणार नाहीत. त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा !

(बातमी ठाणे, वैभव)

✻✻

*'या जगात कुठलीच गोष्ट कायमस्वरुपी राहात नाही, तुमचं दुःखं सुद्धा !'*

# मे. शंकर गणेश देवस्थळी

**प्रेषक : श्री. अमित शहाणे,** कार्यवाह, पुणे संघ

**शतकपूर्ती आपुलकीची, विश्वासाची !**

*जिभेवर सरस्वतीचा वास आणि वाणीमध्ये गोडवा असल्यास कोणत्याही व्यवसायाला यशाचे शिखर गाठणे कठीण नसते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे खारेपाटण येथील मे. शंकर गणेश देवस्थळी ही औषध विक्री संस्था ! या संस्थेला २०२१ च्या गुढीपाडव्याला म्हणजे मंगळवार, १३ एप्रिलला शंभर वर्षे पूर्ण झाली. खरं तर या शतकपूर्तीचे रहस्य म्हणजे देवस्थळी कुटुंबियांनी ग्राहकांसोबत परंपरागत जोपासलेला जिव्हाळा. ग्राहक हेच आपले दैवत मानून त्यांची यथाशक्ती सेवा करणे, हेच या कुटुंबियांचे कर्तव्य. मृदुभाषी, आपुलकी, संयम व व्यावहारिक सचोटी या गुणांच्या आधारे मे. शंकर गणेश देवस्थळी या संस्थेने यशस्वी शंभर वर्षे पूर्ण केली आहेत. या शतकमहोत्सवी कारकीर्दीचा घेतलेला हा आढावा.*

१९२१ नंतर पणजोबांच्या कारकीर्दीपासून आज चौथी पिढी या व्यवसायात कार्यरत झाली आहे. परंतु आजपर्यंत ग्राहकांशी असलेले आपुलकीचे नाते तसूभरही कमी झालेले नाही. या उलट व्यवसायात उत्तरोत्तर प्रगती करून आज शतकोत्तर यशाच्या शिखरावर जाऊन दिमाखात विराजमान झलेली ही संस्था आजही तितक्याच प्रांजळपणे सेवा देत आहेत. अशा अखंड शतकी सेवेचा व्यापारी वर्गाने आदर्श घ्यावा तेवढा थोडाच. 'मे. शंकर गणेश देवस्थळी' या संस्थेच्या प्रामाणिक सेवेची दखल घेऊन सावंतवाडी येथील भोसले फार्मसी कॉलेजने या संस्थेला 'फार्मासिस्ट ऑफ द इअर' या गौरवशाली पुरस्काराने सन्मानित केले. त्याचप्रमाणे २०१९ या सालचा खारेपाटण व्यापारी असोसिएशनच्यावतीने 'आदर्श व्यापारी' पुरस्काराने संस्थेला सन्मानित केले. अशा गौरवशाली संस्थेला शताब्दी वाटचालीच्या सर्व आप्तेष्ट, मित्रमंडळी, ग्राहक व हितचिंतकांच्यावतीने लाख लाख शुभेच्छा!

शतकोत्तर यशस्वी वाटचालीची सध्याची धुरा समर्थपणे सांभाळणारे श्री. अनंत उर्फ अनिल भास्कर देवस्थळी हे आपल्या मनोगतात सांगतात, आमचे आजोबा (कै.) शंकर गणेश देवस्थळी यांनी आपली शिक्षकी पेशातील नोकरी सोडून १९२१ साली गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर फक्त रुपये एकशे पंचवीस या तुटपुंज्या भांडवलावर (कै.) परशुराम भाऊ देवस्थळी यांच्या खारेपाटण बाजारपेठेतील वास्तूमध्ये काष्ठ औषधांसह इतर मालाचा किरकोळ स्वरुपातील दुकान व्यवसाय सुरु केला. व्यवसायाता नवीन असल्यामुळे आणि भांडवलाची कमतरता असल्यामुळे त्यांना सुरुवातीला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. परंतु अशा परिस्थितीत त्यांनी जिद्द न सोडता कष्टाने व प्रामाणिकपणे आपला व्यवसाय सुरुच ठेवला. साधारणतः सात ते आठ वर्षांनतर म्हणजेच सन १९२८-२९ च्या दरम्यान त्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे व्यवसायातून निवृत्त व्हावे लागले. परंतु 'पुढील पिढीने सचोटीने व प्रामाणिकपणे हा व्यवसाय करा' ही त्यांची शिकवण सर्वांना स्मरणात राहिली होती.

आजोबाच्या निवृत्तीनंतर व्यवसायाची धुरा आमचे मोठे काका (कै.) श्रीपाद शंकर उर्फ अण्णा देवस्थळी यांच्याकडे आली. त्यांनी आजोबांच्या व्यवसायात वाढ करण्याचे ठरविले. त्या जिद्दीने खरेदीसाठी त्यांनी मुंबई गाठली. मुंबई

मार्केटसारख्या अथांग महासागरात ज्या-ज्या नवीन वस्तू, खेळणी, मॉडेल ते पाहत असत, ते-ते दुकानात विक्रीसाठी घेऊन येत असत. मुंबईत खरेदी असल्यामुळे अनेक नवनवीन वस्तूंची भर आमच्या दुकानात पडू लागली. नवनवीन वस्तू आमच्या दुकानात उपलब्ध होऊ लागल्या. साहजिकच ग्राहकांची ओढ आमच्या दुकानाच्या दिशेने वाढली. सुई-दोरा, अंगुस्तान, बटणे इत्यादी टेलरिंग मटेरियल, खिळे, तार चूक, घमेली, फाळ, फावडे इत्यादी लोखंडी मटेरिअल, टू पीन, थ्री पीन, वायर, स्विच इत्यादी इलेक्ट्रॉनिक मटेरिअल, छत्र्या व त्यांचे स्पेअर पार्टस्, वही, पेन, कागद रिम, पेन्सिल इत्यादी स्टेशनरी मटेरिअल, कडू तेल, राई तेल, बेल तेल, इत्यादी तेल सामान, गणपती रंग व सजावटीचे सामान, दिवाळी फटाके, राख्या, तसेच ज्येष्ठमध, मुरुडशेंग, वेखंड इत्यादी काष्ठ औषधी अशा अनेक प्रकारच्या वेळोवेळी सिझनप्रमाणे, सणाप्रमाणे लागणाऱ्या वस्तू दुकानात उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. केवळ खारेपाटण बाजारपेठ न सांभाळता त्यांनी कात्रादेवीची यात्रा, पाटगाव यात्रा, कुणकेश्वर यात्रा अशा अनेक यात्रा करून आमचा व्यवसाय दशक्रोशीमध्ये पसरविला. नुसती खरेदी-विक्री न करता आपली उधारी कोणाकडे किती आहे, हे त्यांच्या तोंडी असायचे. व्यवसाय सांभाळताना त्यांनी कधी आध्यात्माकडे दुर्लक्ष केले नाही. आमचे ग्रामदैवत श्री कालभैरव देवावर त्यांची नितांत श्रद्धा. 'श्री कालभैरव महाराज की जय' असा जप त्यांच्या तोंडी कायम असे. त्या देवस्थानासाठी एक विशिष्ट निधी असावा, यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली. त्यामुळे श्री कालभैरव महाराजांचा वरदहस्त त्यांच्या डोक्यावर असे.

प्रत्येक यादी करताना प्रथम 'श्री' लिहा व मगच यादी करा, असे आवर्जून सांगत असत. 'श्री' म्हणजे 'श्री परमेश्वर.' त्यांचे स्मरण करूनच पुढे सुरुवात करा, असा त्याचा अर्थ होता. त्यांनी सन १९५२ पर्यंत एकट्याने व्यवसाय वाढीचा अतोनात प्रयत्न केला.

त्यानंतर सन १९५२ साली या व्यवसायात आमचे वडील (कै.) भास्कर शंकर ऊर्फ बंडू काका देवस्थळी हे आपले शिक्षण पूर्ण करून नवीन व्हिजन घेऊन (कै.) अण्णांच्या मदतीला आले. त्यांनी व्यवसायाचा 'लूक' पूर्णपणे बदलला. खारेपाटण टाकेवाडी येथील श्री. भास्कर मिस्त्री यांच्याकडून नवीन कपाटे, काऊंटर करून घेतले. त्यामुळे दुकानाचा चेहरामोहरा बदलला. औषध विक्रीसाठी आवश्यक असणारे परवाने त्यांनी मिळवून व्यवसायवृद्धीमध्ये मोलाची भर टाकली. वेळोवेळी मुंबईत खरेदी शक्य नसल्यामुळे व मालाची त्वरीत उपलब्धता व्हावी, यासाठी त्यांनी कोल्हापूरला खरेदी सुरु केली. कोणतीही वस्तू आपल्या दुकानात नाही, असे म्हणावे लागू नये, याची पूर्ण खबरदारी ते घेत असत. कोणतीही वस्तू ग्राहकाला नाही म्हणणे कठीण वाटायचे. त्यामुळे ते नेहमी देतो देतो असे तीन-चार वेळा म्हणून शेवटी 'उद्या देतो' असे म्हणत असत. याच शब्दांची आठवण आजही आमचे एक सन्माननीय ग्राहक सौ. काळे बाई करून देतात.

आमचे दुकान म्हणजे त्या काळातील एक डिपार्टमेंटल स्टोअर्स होते. सर्वसाधारणपणे आमच्या दुकानात कोणतीही वस्तू मिळाली नाही, असे होत नसे. त्यामुळे लोकांनीच आदराने आमच्या दुकानाचे नाव 'नडीत वस्तुसंग्रहालय' असे ठेवले. नडीत म्हणजे 'न आडीत.' इमानदारीने व्यवसाय केला पाहिजे, असे ते नेहमी म्हणत असत. त्याची प्रचिती आम्ही बऱ्याच वेळा घेतली आहे. याचेच एक उदाहरण द्यायचे झाले तर एकदा कोल्हापूरच्या एका व्यापाऱ्याकडून त्यांनी माल खरेदी केला होता. त्यांचे पैसे देण्यासाठी ते जेव्हा कोल्हापूर येथे गेले,

तेव्हा त्या व्यापाऱ्याने काही कारणास्तव आपला व्यवसाय बंद केला असल्याचे त्यांना कळले. परंतु त्या व्यापाऱ्याचे पैसे देणे असल्याने आमचे वडील बेचैन होते. त्यावेळी त्यांनी त्या व्यवसायिकाचा पत्ता त्यांच्या दुकानाच्या शेजाऱ्यांकडून घेऊन त्यांचे पैसे त्या व्यवसायिकांच्या घरी पोहोच केले. असे अनेक प्रामाणिकपणाचे अनुभव आम्ही अनुभवले आहेत. बाजारपेठेत व्यवसायासाठी आपली स्वतःची जागा असावी, हा त्यांनी ध्यास घेतला होता आणि परमेश्वरकृपेने त्यांनी तो पूर्णही केला.

पुढे १९७७ साली आमचा मोठा भाऊ (कै.) माधव यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्यावर मोठा आघात झाला आणि ते पूर्ण खचून गेले. व्यवसाय करण्याची उमेद त्यांच्यामध्ये राहिली नाही. त्यावेळी आमचा मोठा सख्खा चुलत भाऊ (कै.) अण्णांचा मोठा मुलगा (कै.) श्रीराम श्रीपाद देवस्थळी आपली सांडू ब्रदर्समधील नोकरी सोडून व्यवसाय पाहण्याकरता खारेपाटण येथे आले. त्यांनी सन १९८९ पर्यंत यशस्वीपणे व्यवसाय सांभाळला. मुंबईत व कोल्हापूरमधील खरेदी यांच्या दरातील तफावत आणि त्याचा ग्राहकांनाच पडणारा आर्थिक भार या गोष्टींचा विचार करून ग्राहकांना अधिक स्वस्त दरात व वेळेत माल उपलब्ध करून देण्याचा विचार आमचे मुंबईस्थित बंधू श्री. भालचंद्र श्रीपाद ऊर्फ भाऊ देवस्थळी यांनी मांडला व मुंबईत खरेदीची जबाबदारी आपल्याकजे घेतली. त्यामुळे ग्राहकांना अल्पदरात व वेळेवर माल पुरवू शकलो. त्यांचे बालपण दुकानात मदत करण्यासाठी गेल्यामुळे दुकानाची इत्यंभूत माहिती भाऊंना होती. त्याचा त्यावेळी उपयोग झाला. त्यानंतर सन १९८९ साली व्यवसाय पुढे चालविण्याची जबाबदारी परमेश्वराने आमच्यावर टाकली. परमेश्वराच्या आशीर्वादाने, वाडवडिलांच्या पुण्याईने, सर्व कर्मचारी यांच्या सहकार्याने, आम्हाला मालाचा पुरवठा करणारे सर्व सप्लायर्स व आमच्यावर वेड्यासारखे प्रेम करणारे असंख्य ग्राहकांमुळेच हे शतक साजरे करण्याचे परमभाग्य आम्हा उभयतांना मिळाले.

या व्यवसायात लक्ष्मीने आमच्या कुटुंबाला भरभरून दिले. आम्ही पूर्ण समाधानी आहोत. कधीही कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू दिली नाही. अनेक अडचणींवर यशस्वीपणे मात करू शकलो. या व्यवसायाच्या शंभर वर्षात आम्हाला सर्व चांगली माणसे भेटली. त्यात आमचे मालक श्रीराम गजानन ऊर्फ शीला देवस्थळी आणि कुटुंबीय यांच्या जागेत आम्ही ८३ वर्षे निश्चिंतपणे व्यवसाय केला. त्यात त्यांचा वाटा मोलाचा व महत्त्वाचा आहे. ज्या-ज्या वेळी व्यवसायाला मदतीची गरज होती, त्या-त्या वेळी आमच्या सर्व बंधू भगिनींनी मदतीचा हात देऊन शतकपूर्तीमध्ये मोठे योगदान केले आहे. आमचे शेजारी श्री. लांजेकर यांचा मोठा आधार आहे. श्री. मधुअण्णा देवस्थळी हे आम्हाला पितृस्थानी असून त्यांचे मार्गदर्शन वेळोवेळी आम्हाला मिळत असते.

बँक ऑफ महाराष्ट्र यांचे आर्थिक सहकार्य फार मोठे आहे. त्यांनी आम्हाला आर्थिक चणचण कधीच भासू दिली नाही. खारेपाटण दशक्रोशीमधील वैद्यकीय व्यवसाय करणारे सर्व डॉक्टर्स... विशेषतः डॉ. उमेश बालन व त्यांचे वडील यांनी केलेले सहकार्य न फिटणाऱ्या ऋणासारखे आहेत. या आमच्या शतकभराच्या सेवेमध्ये ज्ञात-अज्ञातपणे कुणाचे मन दुखावले गेले असेल किंवा आमच्याकडून कुणावर अन्याय झाला असेल, तर आम्ही दिलगीर आहोत. तसेच या शताब्दी सेवेमध्ये ज्यांनी-ज्यांनी आम्हाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केले आहे, त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

(संकलन : **योगेश गोडवे**, खारेपाटण)

# शतायुषी : श्री. गंगाधरशास्त्री नवरे

**श्री. हेमंत किर्लोस्कर,** कार्यवाह, मुंबई संघ ✻ मो. ९८२०१६४५७७



शतायुषी श्री. गंगाधरशास्त्री नवरे यांचा सत्कार रविवार दि. १४ मार्च, २०२१ रोजी त्यांच्या डोबिवली येथील निवासस्थानी करण्यात आला. सत्काराची सुरुवात सुहासिनींनी केलेल्या औक्षणाने झाली. स्वतः श्री गंगाधरशास्त्री नवरे व त्यांचे चिरंजीव श्री. प्रदीप नवरे यांनी खणखणीत आवाजात मंत्रोच्चार करून वातावरण पवित्र केले. संघातर्फे उत्समूर्तीचा शाल, श्रीफळ, गुलाब पुष्प, गणपती, मिठाई व चांदीची समई देऊन सत्कार करण्यात आला. कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई तर्फे संघाचे कार्यवाह श्री. हेमंत किर्लोस्कर, कार्योपाध्यक्ष श्री. शरद गणपत्ये, उप-कार्यवाह सौ. अदिती तांबे, सदस्या सौ. अमृता किर्लोस्कर व सौ. शिल्पा गणपत्ये उपस्थित होत्या. तसेच श्री. गंगाधरशास्त्री यांचे आप्त व स्वकीय सत्कारास उत्साहात हजर होते. कार्यवाह श्री. हेमंत किर्लोस्कर यांनी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईच्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांस दिली. शतायुषी श्री. गंगाधरशास्त्री नवरे यांनी त्यांच्या जीवनातील विविध संस्मरणीय गोष्टींविषयी माहिती सांगितली. अल्पोपहार चालू असताना त्यांच्या नातेवाईक आणि घरच्यांनी त्यांचा स्वभाव व कार्याविषयी बरीच माहिती कथन केली. श्री. प्रदीप नवरे यांनी उपस्थितांचे तसेच कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई व त्यांच्या कार्यकारिणी समितीचे, शतायुषी श्री. गंगाधरशास्त्रींचा सत्कार केल्याप्रित्यर्थ आभार मानले.

✻✻





*माणसाच्या विचारांमध्ये **'विवेक'** असला, स्वभावामध्ये **'विनय'** असला आणि संभाषणामध्ये **'विनम्रता'** असली की, तो माणूस जीवनातील कोणत्याही कठीण प्रसंगावर **'विजय'** मिळवू शकतो.*

*जगणं ठाऊक असणाऱ्यांना, वागणं कसं असावं हा प्रश्न कधीच पडत नाही.*
*जीवन जगण्याची कला फक्त त्यांनाच माहित असते जे स्वतः सोबत दुसऱ्याच्याही आनंदाचा मनापासून विचार करतात.*

# ** वार्षिक अहवाल **

## डोंबिवली

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या समाज मंदिर सभागृहात रविवार दिनांक १४-२-२०२१ रोजी सकाळी १० वा आयोजित केली. गणसंख्येअभावी सभेचे कामकाज सकाळी १०.३० वा. सुरु झाले. सभा सुरु होण्यापूर्वी उपस्थित सभासदांना चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

सभा सुरु होण्यापूर्वी मागील सभेपासून आजपर्यंत दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहिली व सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

संस्थेचे सरकार्यवाह श्री. नितीन शेंबेकर यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर कार्यवाह श्री. संदीप पुराणिक यांनी मागील दिनांक १४-७-२०१९ रोजी झालेल्या सभेचा वृत्तांत वाचून दाखवला. सभेने इतिवृत्तास मंजुरी दिली. (मागील वर्षी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे वार्षिक सर्वसाधारण सभा होवू शकली नाही.)

संस्थेचे कोषपाल श्री. अशोक भागवत यांनी वार्षिक जमा-खर्चाचे वाचन केले व सभासदांनी







विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली व त्यांचे समाधान केले.

सरकार्यवाह श्री. नितीन शेंबेकर यांनी संस्थेच्या गेल्या वर्षी सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त म्हणजे २०२०-२१ मध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार होते. परंतु कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे कोणतेही कार्यक्रम करता आलेले नाहीत. गेल्यावर्षी जानेवारीला फक्त संक्रांत संमेलन, तेवढेच झाले. त्यानंतर कोणताही कार्यक्रम करु शकलो नाही. याबद्दल खंत व्यक्त केली. आता यापुढे परिस्थिती व्यवस्थित झाली तर आपण सर्व कार्यक्रमांना सुरुवात करु. असेही त्यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष श्री. सुहास पंडित यांनी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमासंबंधी माहिती दिली. तसेच सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. तसेच संस्थेच्या घटनेमध्ये काही दुरुस्ती करून घेतली त्याविषयी माहिती दिली आणि उपस्थित सभासदांचे आभार मानले.

सभेपुढे अन्य विषय नसल्यामुळे सभा संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले. सरकारी

नियमांनुसार सुरक्षित अंतर ठेवून सर्वांनी मास्क लावून, सॅनिटायझरचा वापर करून सभेचे कामकाज व्यवस्थित पार पडले.

सभा खेळीमेळीत पार पडली. कोरोनाचे संकट असूनही या सभेला ६१ आनंददायी उपस्थिती होती हे सांगण्यास समाधान वाटते.

– **श्री. प्रदीप हळबे**, डोंबिवली
संपर्क, शहर प्रतिनिधी

## पुणे

कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे यांची २०१९-२० या आर्थिक वर्षाची, वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २८ मार्च २०२१ रोजी पुण्याई सभागृह, पौड रोड, पुणे येथे संपन्न झाली. संघाची ही एकंदरीत नव्वदावी वार्षिक सर्वसाधारण सभा होती. कोरोनाच्या निर्बंधामुळे केवळ ५० लोकांना सभेस प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची परवानगी होती त्यामुळे शासनाचे नियम पाळून प्रत्यक्ष तसेच ऑनलाईन पद्धतीने मिटिंग घेण्यात आली.

सुरुवातीला ज्ञात-अज्ञात सभासदांना श्रद्धांजली वाहून सभेला सुरुवात झाली. अध्यक्ष मकरंद फणसळकर यांनी २०१९-२२ कार्यकारिणीने ५ ऑक्टोबर २०१९ रोजी कामकाज पाहिल्या लागल्यानंतरचा आढावा सभासदांना सांगितला. तसेच कोविड काळात संघातर्फे केलेल्या मदत कार्याची माहिती सभासदांना दिली. संघातर्फे नुकत्याच, लोकसहभागातून घेतलेल्या ॲम्ब्युलन्स संदर्भात माहिती दिली. सर्व देणगीदार बंधू भगिनींचे आभार मानले. त्यानंतर वार्षिक अहवाल, अकौंट्स, बजेट तसेच इतर मुद्द्यावर चर्चा खेळीमेळीच्या वातावरणात झाली.

सचिव अमित शहाणे ह्यांनी आगामी काळातील उपक्रमांची माहिती दिली. गोळविलकर या पुण्यातील प्रतिथयश लॅबोरेटरीने संघाच्या सभासदांना चाचण्यांमध्ये २०% सवलत दिली जाणार असल्याचे सांगितले. ह्यावेळी सर्व कार्यकारिणी तर्फे कोविड आटोक्यात आल्यानंतर एक मोठा कार्यक्रम घेऊन सर्व आजी माजी कार्यकारिणी सदस्य तसेच नव्या जुन्या सभासदांचे एकत्रीकरण करण्याचा मानस बोलून दाखवला.

या सभेत सध्याच्या कार्यकारिणीने राबवलेल्या उपक्रमांबद्दल प्रातिनिधिक स्वरुपात, अध्यक्ष मकरंद फणसळकर आणि सचिव अमित शहाणे ह्यांचा सत्कार, संघाचे ज्येष्ठ सभासद श्री गिरीश शेवडे तसेच राजन श्रीखंडे ह्यांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित सभासद, प्रिंटिंगचे काम करणारे श्री जे प्रिंटर, पुण्याईचे श्री गजानन पाध्ये, पत्की सोमण चार्टर्ड अकौंटंट ह्यांचे श्री चांडक साहेब, ऑनलाईन मिटिंग घेण्यासाठी बहुमोल सहकार्य लाभलेले यशोधन नाटेकर, संघाच्या स्टाफ मेंबर स्मिता ह्या सर्वांचे आभार मानण्यात आले. सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

– **श्री. अमित शहाणे,**
कार्यवाह, पुणे संघ

## कार्यक्रम वृत्तांत (रविवार, दि. १४ मार्च २१)

आपल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघासाठी हा दिवस खूप आनंदाचा होता. शक्यतो दर महिन्याला एक कार्यक्रम करावा अशी कार्यकारी मंडळाची इच्छा आहे. या अनुषंगाने दि. १४ च्या रविवारी ‘आंतरराष्ट्रीय स्त्री शक्ती दिवस’ साजरा करण्याचा निर्णय घेतला गेला. दि. ८ मार्चला साऱ्या जगभर साजरा झालेला हा दिवस, आपण आपल्या सोयीनुसार वरील दिवशी साजरा करण्याचे ठरविले. दिवसेंदिवस उत्कर्षाची प्रगतीची नवनवीन शिखरे सर करणाऱ्या जगभरातील स्त्री शक्तीचा गौरव करण्याचा हा सुअवसर आपण का गमवावा ? गेल्या काही शतकांतील भारतीय स्त्रीने जी

प्रेरणादायी कार्ये केली आहेत आणि प्रगतीचा मार्ग मोकळा करण्याचे उत्तुंग कार्य केले आहे त्याची दखल आपण घ्यायलाच हवी व भूतकाळातील त्या नारीरत्नांचे पुण्यस्मरण व्हायलाच हवे ना ! तर अशी ही पूर्वभूमिका.

दि. १४ मार्च रोजी दुपारी ४.३० वाजता या सुंदर कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. संघाच्या अभिमंत्राच्या पठणाने सुरुवात झाली. कुमारी मधुरा निखिल खांडेकर या कथ्थक नृत्यांगनेने गणेश वंदनाची देखणी प्रस्तुती कथ्थक शैलीतून केली आणि उपस्थित रसिकांकडून कौतुकाच्या टाळ्या मिळविल्या. पाठोपाठ एक भरतनाट्यमची कलावती कन्या कु. निधी खांडेकर हिने पारंपारिक शैलीने मीनाश्री देवीचे स्तवन सादर केले. या अनोख्या नृत्याने उपस्थित सभासदांना खूप आनंद दिला. नृत्याच्या क्षेत्रातली स्त्रीच्या प्रगतीचे एक छोटेसे उदाहरण असे या कार्यक्रमाला म्हणायला हरकत नाही.

या नंतर श्रीमती रोहिणी खांडेकर यांनी आजच्या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन त्या अनुसार एक छोटासा Quiz कार्यक्रम सादर केला. इतिहासात होऊन गेलेल्या झाशीची राणी, डॉ. आनंदीबाई जोशी, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, सौ. रमाबाई रानडे व सध्याच्या काळातील सिंधुताई सपकाळ अशा थोर गौरवशाली स्त्रीयांच्या चरित्रांवर आधारित ही प्रश्न मंजुषा सर्वांच्या उपस्थित सादर केली गेली. स्त्री वर्गाने सर्व प्रश्नांना अचूक उत्तरे देऊन कार्यक्रम यशस्वी सादर केला. संपूर्ण कार्यक्रम एक बहारदार उंचीवर नेला.

यानंतर श्री. संजय नाशिककर यांनी संजय–उगाच–उवाच ह्या नावाचा एक बहारदार विनोदी कार्यक्रम सादर केला. हास्य रसयुक्त हा कार्यक्रम उपस्थित प्रेक्षकांना खूपच आवडला.

यानंतर आभार प्रदर्शन आणि चविष्ट खाद्यपदार्थांच्या आस्वादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**– श्री. मधुकर पंडित,**
बडोदा संघ

**



**कोल्हापूर संघातर्फे**
**१८ ते ४४ वयोगटातील सभासद, कुटुंबीय व इतर यासाठी पेड Vaccine cCamp**

**माझे कुटुंब, माझी जबाबदारी**







**– श्री. धर्मराज पंडित,** कार्यवाह, कोल्हापूर संघ

## बडोदा संघ – मार्च २०२१ च्या कार्यक्रमाची काही क्षणचित्रे

– श्री. मधुकर पंडित



Quiz कार्यक्रम सादर करताना
श्रीमती रोहिणी खांडेकर



श्रीमती मधुरा खांडेकर



श्रीमती निधी खांडेकर







मनोरंजक कार्यक्रम सादर करताना
श्री. संजय नाशिककर







## बडोदा संघ – कार्यक्रम वृत्तांत – फेब्रुवारी २०२१

कोरोना महामारीमुळे राहिलेली सन २०१९–२० ची साधारण समग्र सभा दिनांक. २१–२–२०२१ रोजी घेण्यात आली. त्यातील काही क्षणचित्रे.

















**– श्री. मधुकर पंडित, बडोदा संघ**

झाशीच्या राणीच्या पुण्यतिथीबाबत संभ्रम आहे. काही दिनदर्शिकेमध्ये १७ जून अशी तारीख छापल्यामुळे आणि मुळ तारीख ही १८ जून आहे. त्यामुळे सर्व ठिकाणी १८ जून रोजी झाशीच्या राणीची पुण्यतिथी साजरी व्हावी यासाठी सन्माननीय महापौर श्री. विवेक शेजवळकर, ग्वाल्हेर यांचेकडून मिळविलेल्या पत्राची फोटो कॉफी पाठवित आहे. तरी यासाठी सहकार्य करून ही माहिती आणि पत्र महाराष्ट्र टाइम्सच्या सर्व शहरी आवृत्तीमध्ये यावी. म्हणजे पुढील वर्षापासून दि. १८ जून या योग्य दिवशी पुण्यतिथी साजरी होईल. अशी विनंती.

**



विवेक नारायण शेजवलकर
महापौर

क्रमांक : 15/2015/2/10/परि. ग्वालियर दिनांक 11 जून 2015

प्रति,
श्री गणेश गुर्जर
अध्यक्ष,
कऱ्हाडे ब्राह्मण संघ,
पुणे – महाराष्ट्र

माननीय महोदय,

आपका पत्र दिनांक 04 मई 2015 प्राप्त हुआ। सन् 1857 के स्वतंत्र समर की सेनानी झांसी की रानी लक्ष्मीबाई के बलिदान दिवस के सम्बन्ध में आपने जानकारी चाही है। 18 जून 1858 को रानी लक्ष्मीबाई ने ग्वालियर में अंग्रेजों के खिलाफ युद्ध करते हुए वीरगति प्राप्त की। रानी के बलिदान स्थल पर उनकी एक भव्य अश्वारूढ़ प्रतिमा भी स्थापित है। रानी लक्ष्मीबाई के साथ अंग्रेजों के विरुद्ध युद्ध करते हुए 800 साधुओं ने भी अपने प्राणों की आहुति इस समर में दी थी। इस बलिदानी परम्परा की विरासत के वाहक श्री रामसेवक दास जी महाराज गंगादास की शाला के महंत हैं। यह आश्रम समाधि स्थल के निकट ही है।

दिनांक 18 जून को प्रतिवर्ष ग्वालियर में बलिदान मेले का भी आयोजन गत अनेक वर्षों से किया जा रहा है। ग्वालियर के प्रतिष्ठित समारोहों में इस दो दिवसीय मेले की गणना होती है।

रानी लक्ष्मीबाई ने युद्ध करते हुए गम्भीर रूप से घायल होने के बाद प्राण त्याग किया। उनकी अन्तिम इच्छानुसार उनके पार्थिव शरीर का दाह संस्कार 18 जून 1858 को गंगादास की शाला के तत्कालीन महन्त के हाथों से हुआ था। अंग्रेज उनके मृत शरीर को भी स्पर्श नहीं कर पाये। आज भी रानी लक्ष्मीबाई का पावन समाधि स्थल, ग्वालियर आने वाले हजारों पर्यटकों के लिए श्रद्धा व आकर्षण का केन्द्र तो है ही, देश के करोड़ों निवासियों के लिए प्रेरणा स्त्रोत भी है।

आपसे अनुरोध है कि इस वर्ष 18 जून 2015 को सम्पन्न होने वाले मेले मे आप अवश्य पधारें व रानी लक्ष्मीबाई के बलिदान स्थली का दर्शन करें।

शुभेच्छाओं सहित,

(विवेक नारायण शेजवलकर)
महापौर
नगर निगम, ग्वालियर

कार्यालय : जल विहार, नगर निगम, ग्वालियर ● दूरभाष : 0751-2438240, 2438200 ● फैक्स : 0751-2438230
निवास : "कृष्णा कृपा" विवेकानन्द मार्ग, ग्वालियर ● दूरभाष : 2627300, 2627301, 2438591, 2438238
मोबा. : 9644405600, 9425116300 e-mail : vivekshejwalkar@gmail.com, mayorgwalior@gmail.com

बडोदा संघाचे पूर्व अध्यक्ष **श्री. नीलकंठ मुळ्ये** यांचे
नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.
बडोदा संघाचे पूर्व सहकार्यवाह **श्री. जयंत तांबे** यांचे
नुकतेच दुःखद निधन झाले.
बडोदा संघाने उत्तम कार्य करणारे हे कार्यकर्ते गमावले याबद्दल दुःख वाटते.
सर्वश्री नीलकंठ मुळ्ये आणि जयंत तांबे यांना महासंघाच्या वतीने

# भावपूर्ण श्रद्धांजली !

## सहनशीलता

- पायातून काटा निघाला की, चालायला मजा येते. तसा, मनातून अहंकार निघाला की, आयुष्य जगायला मजा येते.
- मोठ्या लोकांच्या शेजारी राहिलं, म्हणजे मोठं होता येते की नाही ते माहित नाही, पण चांगल्या लोकांच्या सोबतीत राहून नक्कीच मोठं होता येतं.
- 'शिक्षण,' 'डिग्री', 'पैसा' यावरून माणूस कधीच श्रेष्ठ किंवा मोठा होत नसतो, तर 'कष्ट', 'अनुभव' व 'माणुसकी' हेच माणसाचं श्रेष्ठत्व ठरवते.
- पूर्ण जग जिंकता येते संस्काराने आणि जिंकलेलं सर्व हरु शकते अहंकाराने !
- एकाच वेळी हजार ध्येये ठेवण्यापेक्षा, हजारवेळा एकच ध्येय ठेवा. तुम्ही यश तर मिळवणारच पण यशाचा इतिहासही घडवाल.
- आठवणी ह्या नेहमीच अविस्मरणीय असतात. काही वेळा आपण रडलेले क्षण आठवून खूप हसत असतो, तर काही वेळा आपण आनंद साजरा केलेले क्षण आठवून खूप रडतो, हीच आयुष्याची गंमत आहे.
- नातं हे रबरासारखं असतं. एकाने सोडून दिल्यावर ज्याने घट्ट धरू ठेवलंय त्यालाच जास्त लागतं.
- लिहिल्याशिवाय दोन शब्दातील अंतर कळतच नाही. तसेच हाक आणि हात दिल्याशिवाय माणसांची मनंही जुळत नाहीत.
- प्रमाणापेक्षा जास्त सुख आणि प्रमाणापेक्षा जास्त दुःख कधीच कुणाजवळ व्यक्त करू नका, कारण लोक सुखांना नजर लावतात आणि दुःखावर मीठ चोळतात.
- झुकणे याचा अर्थ आत्मसन्मान घालविणे हा होत नाही. प्रत्येक किंमती वस्तू उचलण्यासाठी झुकावेच लागते. वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद त्याचपैकी एक आहेत.



Regd. Periodical RNI - No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

WE LOVE
WHAT WE DO.

VJ | VILAS JAVDEKAR DEVELOPERS

www.javdekars.com

Corporate Office : 306, Siddharth Towers, Sangam Press Road,
Kothrud, Pune 411038. T : +91-20-67648000

Book Post ( Regd. Periodical)

प्रेषक :
संपादक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४३ २४४३

To,